


॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ४० वा ❑ भारतीय सौर दिनांक २८ फाल्गुन शके १९४७, गुरूवार दि.१९ मार्च २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# एच पी व्ही लसीच्या शंकेचे निरसन व्हावे!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

एच पी व्ही लस ही गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण करणारी अत्यंत सुरक्षित आणि प्रभावी प्रतिबंधात्मक लस आहे, जी ९-१४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी उत्तम मानली जाते. ती शरीराच्या प्रजनन क्षमतेवर कोणताही विपरीत परिणाम करत नाही आणि कर्करोग टाळण्यासाठी ती एक शक्तिशाली उपाय आहे,असे सरकार व वैद्यकीय अधिकारी सांगत आहेत,मात्र सर्वसामान्य जनतेला या लशी शंका असून या शंकेचे निरसन करणे सरकारची जबाबदारी आहे.

गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून महिलांचे संरक्षण व्हावे, यासाठी केंद्र सरकारच्या वतीने २८ फेब्रुवारीपासून एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. राजस्थानच्या अजमेर येथे पंतप्रधानांनी या लसीकरणाचे उद्घाटन केले. ही लस आपल्या मुलींना वयाच्या १४-१५व्या वर्षात देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी देशातील पालकांना केले आहे. ही मोहीम इतर राज्यांत या वर्षीच्या महिला दिनापासून म्हणजेच ८ मार्चपासून राबवली जात आहे तूर्तास, हे लसीकरण ऐच्छिक आहे. आपल्या मुलीला लस द्यावी की नाही, हा सर्वस्वी पालकांचा निर्णय असेल. कारण त्यासाठी त्यांची संमती आवश्यक आहे. ही लस ९ ते ४५ वर्षांपर्यंतची मुले, पुरुष यांनाही दिली जाते.

गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग मुख्यत्वे ह्युमन पॅपिलोमा व्हायरस नावाच्या विषाणूच्या दीर्घकालीन संसर्गामुळे होतो.हा विषाणू लैंगिक संबंधातून पसरतो आणि गर्भाशय ग्रीवेच्या पेशींमध्ये बदल घडवून आणतो. वेळेवर प्रतिबंधात्मक लस आणि पॅप स्मीअर चाचणीद्वारे हा कर्करोग टाळणे शक्य आहे.

हे या कर्करोगाचे सर्वात प्रमुख कारण आहे.

असुरक्षित लैंगिक संबंध हे देखील एक कारण आहे.

अनेक लैंगिक भागीदार असणे किंवा लहान वयात लैंगिक क्रिया सुरू करणे यामुळे संसर्गाचा धोका वाढतो.

धूम्रपान व तंबाखूचे सेवन गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा धोका वाढवतो.

एचआयव्ही किंवा इतर आजारांमुळे रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्यास कर्करोगाचा धोका वाढतो. खाजगी भागांची योग्य स्वच्छता न राखणे, अशा अनेक कारणांमुळे गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग होतो.

मुलींना वयात येण्यापूर्वी ही लस दिल्यास संसर्गापासून संरक्षण मिळते, नियमित तपासणीमुळे पूर्व-कर्करोग पेशी वेळेत ओळखता येतात, व संभाव्य धोका टाळतो येतो.

मात्र या लसीकरण मोहिमेबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. लसीच्या विश्वासार्हतेबाबत अनेक लोक शंका उपस्थित करीत आहेत.एच पी व्ही लस घेतल्यानंतर इंजेक्शनच्या ठिकाणी वेदना, सूज, सौम्य ताप, थकवा किंवा डोकेदुखी हे सामान्य दुष्परिणाम असू शकतात.

या लशीला अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाकडून डिसेंबर २०१४ मध्ये मान्यता देण्यात आली असली लशीला मान्यता कुठल्या अभ्यासावरून दिली गेली, हे स्पष्ट होत नाही. त्याचबरोबर, याचे कार्य, दुष्परिणाम आणि दूरगामी परिणाम यांबाबत चक्कर येणे, इंजेक्शनच्या जागी सूज इ.लक्षणे सोडून अधिक स्पष्टता दिली गेली नाही. या लशीचे एक ते दोन डोस द्यावेत, असे जागतिक आरोग्य संघटनाचे म्हणणे आहे. सरकारकडून सध्या मोफत दिल्या जात असलेल्या या लशीची किंमत ३९२७ रुपये आहे. तिचा पुढचा डोस कोणाला, कधी द्यायचा, तसेच पुढचा डोसही सरकार मोफत देणार आहे का, याही बाबतीत सरकारकडून स्पष्टता नाही. त्याचवेळी, अमेरिकेचे आरोग्यमंत्री रॉबर्ट एफ. केनेडी यांनी एचव्हीपी लसीकरणाला विरोध करत गार्डासील-४ लस घेतल्यानंतरचा मृत्यूदर कर्करोगापेक्षा ३७ टक्क्यांनी अधिक आहे, असा आक्षेप नोंदवलाआहे.त्यामुळेभारतात त्याबाबत साशंकता निर्माण होते आहे.

भारतीय संविधानात अनुच्छेद २१ अंतर्गत 'जीवन जगण्याच्या अधिकारा'चा भाग म्हणून सर्वोच्च न्यायालयाने आरोग्याचा अधिकार मान्य केला आहे. त्यात, आरोग्य विषयक संपूर्ण माहितीचा अधिकार समाविष्ट होतो. यानुसार, या लसीकरण मोहिमेची संपूर्ण माहिती जनतेला मिळायला हवी. या पार्श्वभूमीवर, या लसीकरणाबाबत शंका असल्यास पालकांनी, जवळचे डॉक्टर, स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, यांच्याशी संवाद साधून निर्णय घ्यायला हवा.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या बुक बँक उपक्रमात जिल्हा माहिती कार्यालयाचे योगदान

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात बुक बँक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात आज जिल्हामाहिती कार्यालयाने विविध पुस्तके योगदान म्हणून दिली. सरस्वती भुवन विद्यालयात आयोजीत एका कार्यक्रमात ही पुस्तके जिल्हाधिकारी स्वामी यांना हस्तांतरीत करण्यात आली.



सरस्वती भुवन विद्यालयात जिल्ह्यातील खाजगी कोचिंग क्लास चालकांची बैठक बोलावण्यात आली होती. विद्यार्थ्यांना ज्या मानसिक ताणाला सामोरे जावे लागते त्याबाबत उपाययोजना करण्यासाठी या बैठकीत जिल्हाधिकारी स्वामी, उपसंचालक प्रशांत दैठणकर, जिल्हा शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, अन्न औषध प्रशासन विभागाचे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

अति स्पर्धेच्या काळात मुलांवर अभ्यासाचा तसेच प्राप्त करावयाच्या गुणांचा, स्पर्धेचा ताण येतो अशा वेळी मुलांना द्यावयाचे समुपदेशन, त्याबाबत करावयाच्या उपाययोजना यासाठी खाजगी कोचिंग क्लासेसने सुद्धा विद्यार्थ्यांना काही वेळ द्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

जिल्हा माहिती कार्यालयातर्फे माहिती जनसंपर्क महासंचालनालयाने प्रकाशित केलेली पुस्तके बुक बँक या उपक्रमात देण्यात आली. सुमारे ५८ हजार रुपये किमतीची ही पुस्तके असून स्पर्धा परीक्षा, अभ्यासपूर्ण संदर्भ साहित्य अशा स्वरुपाची ही पुस्तके असून आता ही पुस्तके शिक्षण विभागाला सुपूर्द करण्यात आली.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी जिल्हा माहिती कार्यालयाने दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर यांनी आभार मानले.

# जालना येथे राज्य नाट्य स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट ती नाटकाचा प्रयोग

ज्योतिर्मय साहित्य

जालना – महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेले ती हे नाटक जालनेकरांसाठी येत्या रविवारी सादर होणार आहे.

कलावर्धिनी संस्थेच्या वतीने उत्कर्ष थिएटर्स जालना निर्मित या नाटकाचा प्रयोग रविवार, २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता चुन्नीलाल जी. गोयल सभागृह, जेईएस कॉलेज, जालना येथे संपन्न होईल.

सतीश लिंगडे लिखित व सुमीत शर्मा दिग्दर्शित हे दोन अंकी नाटक सध्या गाजत असून जालन्यातील रसिकांना हा प्रयोग विनामूल्य पाहता येणार आहे.

या प्रयोगासाठी नाट्यांकुर जालना यांचे विशेष साहाय्य लाभले असून प्रमुख उपस्थिती म्हणून सुनीलभाई रायठठ्ठा (उद्योजक जालना), अरुण अग्रवाल (उद्योजक जालना), अनया अग्रवाल (समाजसेविका जालना), पुरुषोत्तम बगडिया (अध्यक्ष जे.ई.एस. महाविद्यालय), डॉ. गणेश अग्निहोत्री (प्राचार्य जे.ई.एस. महाविद्यालय), प्रा. शिवाजी मदन (आनंद फाउंडेशन जालना), भरत भांदरगे (आर. पी. ग्रुप ऑफ स्कूल) आणि राजकुमार तांगडे (नाट्यलेखक) यांची उपस्थिती लाभणार आहे.

या नाटकामध्ये सतीश लिंगडे, विनोद जैतमहाल, रेखा चव्हाण, कपिल रोडगे, गणेश लोखंडे, पवन खांदे, आकाश ओहाळ, मिलिंद दुसे, सुंदर कुँवरपुरिया, आनंद घुले, सोहन



भुरेवाल, गौरी गिल्डा, प्रेरणा सराफ, सानवी संबरकर, सुकृती काकडे, नीलेश सपकाळ, संतोष गौतम, वर्षाराणी कोळवले, संध्या शर्मा आणि सुमीत शर्मा हे कलावंत आहेत.

# समाजहिताची वाचन चळवळ समृद्ध व्हावी : पंढरीत ग्रंथोत्सवाचा समारोप




ज्योतिर्मय साहित्य

पंढरपूर – राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ग्रंथोत्सव सुरू आहेत. परंतु, पंढरीच्या या पावन नगरीतील ग्रंथोत्सव वाचन आणि ग्रंथालय चळवळीचा उद्देश खरोखर सफल करणारा ठरला आहे. ग्रंथ आणि वाचन ही पवित्र, समाज हिताची चळवळ वाढली पाहिजे, समृद्ध झाली पाहिजे, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. ग्रंथालयांनी वाचकांची वाट न पाहता आपणच वाचकांपर्यंत जाण्याचा संकल्प नवीन वर्षात करावा, असे आवाहन राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरणांतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, राज्य ग्रंथालय संचालनालय, सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि सोलापूर ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय ग्रंथोत्सवाचा समारोप झाला. याप्रसंगी गाडेकर प्रमुख उपस्थित होते, अध्यक्षस्थानी ग्रंथमित्र कुंडलिक मोरे होते. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष जोतिराम गायकवाड, मराठी भाषा अधिकारी प्रमोद पाटील, ग्रंथालय निरीक्षक संजय ढेरे, प्रदीप गाडे प्रमुख उपस्थित होते.

अध्यक्षपदावरून बोलताना कुंडलिक मोरे यांनी जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळीचा आढावा घेतला. जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे यांनी प्रास्ताविक केले. साहित्य आणि ग्रंथ हे समाजात परिवर्तनाचे काम करतात. वाचकांना अंतर्मुख होऊन जगण्याचे बळ देतात. वाचक हा या चळवळीचा आत्मा आहे. ग्रंथोत्सवाचे औचित्य साधून अनेक प्रकाशकांनी पुस्तक प्रदर्शन व विक्रीचे स्टॉल उभारले होते. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहाय्यक संचालक सुनील हुसे यांनी अधिकाधिक ग्रंथ खरेदीचे आवाहन केले. त्यानुसार दोन दिवसांत प्रत्येक ठिकाणी शेकडो पुस्तकांची विक्री झाली. वाचन चळवळीसाठी ही बाब अतिशय सुखद असल्याचे हुसे यांनी नमूद केले. वाचक वाढले तरच चळवळीला अर्थ आहे. त्यादृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करूयात, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्ह्यातील उत्कृष्ठ ग्रंथपाल, वाचक तसेच पुस्तक प्रकाशकांचा प्रातिनिधीक सन्मान करण्यात आला.

दोन दिवसांत प्रत्येक ठिकाणी शेकडो पुस्तकांची विक्री झाली कार्यक्रमासाठी तानाजी जाधव, प्रशांत जाधव, विनोद गायकवाड, फ ुलचंद नागटिळक, अन्सर शेख, कृष्णदेव मदने, रवी गाजरे, सुभाष सुडके, राजेश पवार, रामदास नागटिळक, हणमंत शिंदे, विनायक गुरव आदींनी परिश्रम घेतले. जिल्ह्यातील पदाधिकारी, वाचक, कार्यकर्ते उपस्थित होते. जोतिराम गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले.





॥ज्योतिर्मय॥

गुढीपाडव्यापासून आपण ज्योतिर्मय दैनिकात वाढदिवसाच्या शुभेच्छा जाहिराती सुरु करीत आहोत, आपल्या घरातील मुलांचे किंवा मुलींचे वाढदिवस शुभेच्छारुपी जाहिराती मधून साजरे करणार आहोत.
शुभेच्छा दिल्याने प्रेम वाढते, आपुलकी वाढते तसेच आनंदी वातावरण निर्माण होते.
सर्वांना ही कल्पना निश्चित आवडेल असे मला वाटते.
त्याकरिता नाममात्र शुल्क असणार आहे.

- 15 वर्षाच्या आत असेल तर फक्त 100 रुपये
- 15 वर्षावरील व्यक्तीस फक्त 300 रुपये.
- जाहिरातीचा मॅटर व पैसे वाढदिवसाच्या दोन दिवस अगोदर पाठविणे.
- डिझाईन करून पाठविले तरी चालेल, किंवा मॅटर व्हाट्सअप वर पाठविणे, मॅटर लिमिटेड असावा.
- जाहिरातीचे पेमेंट 7743918559 या नंबरवर ऑनलाईन पाठविणे.
- काही शंका असेल तर 7743818559 या नंबरवर फोन करणे.
- पुण्यस्मरणची जाहिरात पण फक्त 100 रु.मध्ये प्रकाशित केली जाईल.

जाहिरात व्यवस्थापक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे




## जात्यावरच्या ओव्या......

मन चुलीतली राख
इस्तु झाकून ठेवती
घेती परतून पेट
वरून येगळी दिसती ||५५०||

मन भटकली वाट
हिला पडला चकवा
आली आली ध्यानावर
नाव देवाजीच घेता, ||५५१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७-८




ज्योतिर्मय साहित्य

इतरांसाठी काही करायचे तर फक्त एक दिवस झिजून चालत नाही. ती सवय व्हावी लागते, वृत्तीला तसे वळण लावावे लागते. म्हणूनच समर्थ म्हणतात मना सज्जना हेचि क्रीया धरावी. अशा प्रकारचे सेवेमध्ये सातत्य असावे लागते. अशा प्रकारचे सातत्य जर आपल्या सेवेत आणि वागण्याबोलण्यात असेल तर त्यामुळे सज्जन म्हणजे समाजातील सदाचरणी लोक प्रसन्न होतात, संतुष्ट होतात.

समाजातील बऱ्याच लोकांकडे सत्ता आणि संपत्ती असते. त्यातील काही लोक आपल्या सत्तेच्या आणि संपत्तीच्या बळावर विविध संस्थांना देणग्या देऊन आपले नाव द्यायला लावतात. विविध प्रकारे प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करतात. तशी ती त्यांना काही काळ मिळते देखील. इमारतीच्या फलकांवर किंवा दगडांवर त्यांचे नाव कोरले गेलेले असते. तरीदेखील काही काळानंतर अशा व्यक्ती विस्मृतीत जातात. परंतु कोणत्याही प्रकारचा स्वार्थ किंवा प्रसिद्धीची हाव न धरता जे सातत्याने समाजासाठी झिजत असतात, अशा व्यक्तींचे नाव समाज कायम आदराने घेत असतो. अशा व्यक्तींचे नाव समाजाच्या मनात कोरले जाते. त्याला कायमस्वरूपी आदराचे स्थान असते. अहिल्याबाईंनी आपला राज्यकारभार करत असताना समाजासाठी घाट बांधले, अन्नछत्रे पाणपोया उभारल्या. यासारखी विविध समाजोपयोगी कामे केली आणि त्यासाठी पैसा खर्च केला. त्यामुळे आपण आजही त्यांचे नाव आदराने घेतो. इतरांची नावे विसरली जातात. म्हणूनच त्यांची कीर्ती आजही जिवंत आहे.



समर्थांचा संदेश स्पष्ट आहे

कीर्ती मागे राहावी असे वाटत असेल तर आयुष्य इतरांसाठी झिजवले पाहिजे. आणि हे झिजणे एकदाच नव्हे, तर वृत्ती म्हणून अंगीकारले पाहिजे.

''मना सज्जना हेचि क्रीया धरावी''

ही कृती, ही वृत्ती, ही सातत्यपूर्ण सेवा हाच खरा साधनेचा मार्ग आहे.

स्वसंवाद : मी केवळ स्वत: साठी जगतो आहे की इतरांसाठी झिजून त्यांनाही आनंद देण्याचा प्रयत्न करतो आहे ?


माझ्या कृतींमागे प्रसिद्धीची अपेक्षा आहे का, की निखळ सेवाभाव ?

हा सेवाभाव मी एक वृत्ती म्हणून अंगीकारला आहे का ?

माझ्या वागण्याने किंवा सेवाभावाने समाजातील सज्जन किंवा सदाचरणी लोक संतुष्ट होतात का ?

**(क्रमश:)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## श्रवणनाम निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ मूल्य कोणते आणि ते साधण्याचा किंवा अनुभवण्याचा मार्ग कोणता या दोन्हींची समजेल अशी साध्या सोप्या भाषेत समजून सांगण्याची कला, माणसाच्या अंतरंगात डोकावून बदल घडवण्याचं सामर्थ्य ज्या ज्या ग्रंथात आढळते ते ते वाड्:मयाचे खरे सामर्थ्य होय.

मोक्षाचा मार्ग दाखवताना अनेक फलांचे वर्णन असेल ,अशुभ वासना, प्रापंचिक वासना असेल तिथे आत्मानात्मविवेक कसा बरं सापडेल!!!

उलट वाचकांची अधोगती होईल. म्हणून असे ग्रंथ वाचू नयेत.


परमार्थाच्या कितीही बढाया मारल्या तरी प्रापंचिक माणसाला ग्रंथामधले सांगितलेले फळ ऐकून सकाम माणसाला असे वाटते की ते फळ या जन्मात नाही मिळाले तरी पुढच्या जन्मात मिळेल पण या लोभी हट्टापायी त्याला परत परत जन्म मृत्युच्या फे-यात अडकावे लागते. आणखी लोभापायी मोक्षाच्या मार्गावर न जाता परत जन्म घेऊन अधोगती पत्करावी लागते.

वनांमध्ये बाकीचे पक्षी फळे खातात. पण चकोर पक्षाला फक्त अमृतचं हवे असते. त्याप्रमाणे सांसारिक माणसं वासना धरून बसतात. पण भगवंतावर खरे प्रेम करणारे फक्त भगवंत प्राप्तीची अपेक्षा धरतात.

ते काया, वाचा, मनाने फक अन् फक्त भगवंताच्या चरणी नतमस्तक होतात. त्यांना बाह्य जगातील स्वार्थाने लडबलेल्या जगाशी काहीही संबंध नसतो.

समाजात सर्व स्तरातील लोक आहेत. तमोगुणी, रजोगुणी, आणि सात्विक किंवा सत्वगुणी. भगवंताची आवड असणारे फार कमी असतात.त्यांना परमार्थ साधण्याची हौस असते. भगवंताच्या समीप जाण्यासाठी लागणारे भांण्डार त्यांना ''अद्वेत'' ग्रंथातुन मिळते. **(क्रमश:)**

## नाम आणि सत्कर्म



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम हा सत्कर्माचा पाया आहे तसाच कळसही आहे. भगवंताच्या स्मरणात केलेले कर्मच सत्कर्म या सदरात पडू शकते; भगवंताच्या विस्मरणात केलेले कर्म सत्कर्म ठरू शकत नाही. समजा, एखादा मनुष्य नुसते तोंडाने 'राम, राम' म्हणतो आहे परंतु भगवंताच्या स्मरणात नाही, तर मग 'राम, राम' म्हणण्याची त्याची क्रिया सत्कर्म म्हणता येईल का ? वास्तविक, नाम हे स्वत:सिद्ध असल्याने ते जाणता वा अजाणता म्हटले तरी ते सत्कर्म याच सदरात पडते, कारण 'जेथे माझे नाम तेथे मी पुरुषोत्तम' असे भगवंताचेच वचन आहे. म्हणून नामाचा उच्चार आणि भगवंत या दोन गोष्टी निराळ्या असूच शकत नाहीत. मुखाने नाम म्हणणाऱ्याचे लक्ष भगवंताकडे असो वा नसो, ते सत्कृत्य याच सदरात पडते. इतर कर्मे आणि नाम घेण्याचे कर्म यांत जो मोठा फरक आहे तो हाच की, इतर कर्मांना पूर्णत्व किंवा सत्यत्व नामाने येते, तर उलटपक्षी नाम आणि अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाहीत. म्हणून नाम भगवंताच्या स्मरणात घेतले किंवा कसे हा प्रश्नच उद्भवत नाही. किंबहुना, नाम मुखी आले की सत्कर्मे होऊच लागतात. मूल झाले की मुलाच्या आईला पान्हा फुटणे, मुलाचे लाड करणे, त्याच्यावर सर्वतोपरीने प्रेम करणे, या गोष्टी जशा न शिकविता सहजच होतात, तशीच स्थिती नाम घेणाऱ्याची सत्कर्माच्या बाबतीत होते. इतकेच नव्हे तर, त्या आईला जर म्हटले की तू मुलाला जवळ ठेव, पण त्याच्यावर प्रेम वगैरे काही करू नकोस, तर ते जसे तिला शक्य नाही, त्याचप्रमाणे नाम घेणाराला सत्कर्मे टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत. सत्कर्मे फळाला आली असे केव्हा म्हणता येईल, तर भगवंताचे नाम मुखी येईल तेव्हाच.

परमात्म्याने आपल्याला सांगून ठेवले आहे की, '' तू माझा व्हावास असे तुला वाटते आहे ना ? मग तू प्रपंच अती दक्षतेने कर, प्रयत्नाला कधी मागे पाहू नकोस, पण फळ देणारा मी आहे ही भावना ठेवून तू वाग. जी परिस्थिती येईल त्यात समाधान बिघडू देऊ नकोस, आणि मी जे सांगतो ते औषध घे, ते तुला सर्व रोगांतून मुक्त करील; आणि ते औषध जर कोणते असेल तर ते माझे ' नाम ' हे होय. '' त्या नामाचा खरोखर तुम्ही अभ्यास करा. तुम्ही सर्वांनी असा निश्चय करा, की नामाशिवाय जगणे हे खरे नाही. नामाशिवाय जगू नये असे मला खरोखर मनापासून वाटते. नामावरची निष्ठा कसे काम करते हे निष्ठेने नाम घेणारालाच कळेल. नामाचे प्रेम ज्याला लागले त्याच्या मागे परमात्मा उभा राहिला हे अगदी सत्य, सत्य, त्रिवाचा सत्य सांगतो. म्हणून आवडीने आणि प्रेमाने भगवंताचे नाम घ्या, एकदा तरी त्याला कळकळीने 'रामा! ' अशी हाक मारा, की भगवंताला तुम्हाला येऊन भेटावेसे वाटले पाहिजे.

सत्कर्माचा शेवट भगवंताच्या नामाचे प्रेम उत्पन्न होण्यातच होणे जरूर आहे.

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

पुढे.....
वक्ता विरक्त असावा. तो बुद्धिमान, निस्पृह, दृष्टांत देणारा असावा. तो कसा नसावा. जो विभ्रांत आहे, पाखंडी आहे, पैसे ठरवून भागवत करणारा नसावा.
धुंधूकारी हा योनीतून सुटण्या साठी तळमळ असणारा होता. म्हणून तो उद्धरला.
धुंधुकारी इतका वाईट होता. त्या मानाने आपण तर बरेच बरे आहोत तरी आपल्याला न्यायाला विमान येत नाही.आम्हाला तुरुंगातून सुटायचेच नाही.
एकदा अकबर बादशहा बिरबलास म्हणाला, आज माझा वाढदिवस आहे, मी तुरुंगात असणाऱ्या सर्व कैद्यांना मुक्त करू इच्छितो. त्यावर बिरबल म्हणाला, त्यातील बहुतेक जण पट्टीचे गुन्हेगार आहेत. त्यांना मुक्त केले तर जनतेत अनाचार माजेल. तरीही बादशाह हट्टाला पेटला. म्हणून बिरबल बादशहाला म्हणाला, चला आपण आधी तुरुंगात जाऊन कैद्यांना भेटू. त्याने तुरुंगातील कैद्यांना सांगितले, महाराज तुमच्यावर खुश झाले आहेत. तुमची काय इच्छा असेल तर सांगा! कोणी चांगले अन्न, कोणी चांगले वस्त्र, कोणी राहायला जागा. असे काही काही मागितले. फक्त एका माणसाने अशी इच्छा व्यक्त केली की, मी चुकीने तुरुंगात पडलो आहे. मला मुक्त करा. माझा काहीही दोष नाही. बिरबलाने बादशहास सांगितले की, हा एकटाच मुक्त करण्यात योग्य आहे. बाकीचे बंधनातच राहू इच्छितात.
आपणही असेच बंधनात राहू इच्छितो. भक्तीला तारुण्य यावे साठी ज्ञान व वैराग्य यांना बळ मिळावे म्हणून भागवत आहे. ते पापाची तीव्रता कमी व्हावी म्हणून ही भागवत आहे.या शिवाय दुसरे साधन नाही. आपण धुंदूकारी सारखे वाईट नाहीत व तितके पवित्र ही नाहीत आपण असे अधले मधले आहोत. भक्तीला पुनर्जीवित करणारे व ज्ञान वैराग्य यांना तेजोवान करायला भागवतच लागते.
क्रमश:.......



आरोग्य संजीवनी

## बाळगुटी कोणत्या औषधांचा समावेश असतो? नक्की वाचा!

ज्योतिर्मय साहित्य

आपल्याकडे मुलांना रोज बाळगुटी देण्याची पद्धत आहे. बाळाची प्रतिकारशक्ती उत्तम राखण्यासाठी, पचनशक्ती सुधारून अनेक आजारांवर/शारीरिक तक्रारींवर घरीच उपाय करण्यासाठी व बाळाची शारीरिक व मानसिक वाढ व्यवस्थित होण्यासाठी पूर्वापार चालत आलेली अशी ही घरगुती चिकित्सा पद्धती आहे.

बाळगुटीमध्ये खालील औषधांचा समावेश होतो.

१.मुरुडशेंग : ही १ पोटातील मुरडा कमी करणारी, कृमी कमी करणारी वनस्पती आहे. पोट दुखून, पातळ, फेसकट मलप्रवृत्ती कमी करणारी वनस्पती आहे.

२. हिरडा : याने यकृताचे कार्य सुधारून पचनशक्ती सुधारते. पोटात वात झाल्यास, पोट फुगले असता, पोट रोज साफ होण्यास याचा उपयोग होतो.

३. पिंपळी : श्वसनसंस्था व पचन संस्था उत्तम राखणारे असे हे औषध आहे. सर्दी, खोकला, अजीर्ण यावर उपयोगी आहे.

४. जायफळ : हे मुलाला झोप येत नसल्यास, शांत झोप लागण्यासाठी पातळ शौचास होत असल्यास ३- ४ वेढे इतकेच द्यावे.

५. वेखंड : मुलांची स्मरणशक्ती, मेधा, बुध्दी,आकलनशक्ती वाढविण्यासाठी रोज द्या. याच्या सेवनाने सर्दी, खोकला, कृमी कमी होतात. हे तीक्ष्ण असते त्यामुळे ४-५ वेढेच द्या.

६. बेहडा : सर्दी,खोकला,जुलाब कमी होण्यासाठी उपयुक्त.

७. ज्येष्ठमध : आवाजाला गोडवा येण्यासाठी, कफ कमी करण्यासाठी, वर्ण उजळ करण्यासाठी व उष्णता कमी करण्यासाठी रोज गुटी मधून द्या.

८. नागरमोथा : कृमी कमी करण्यासाठी, लघवीचा त्रास कमी करण्यासाठी याचा उपयोग होतो.

९. काकदशिंगी : उचकी, सर्दी, खोकला, उलटी, जुलाब, ताप, दात येत असताना होणारा त्रास कमी करण्यासाठी रोज गुटी मधून द्या.

१०. हळकुंड : रक्तशुद्धी करण्यासाठी, कफ, सर्दी, ताप, खोकला कमी करण्यासाठी, वर्ण उजळ करण्यासाठी व जंत कमी करण्यासाठी रोज द्या.

११. कायफल : स्वर सुधारण्या साठी व सर्दी, खोकला कमी करण्यासाठी उपयोगी.

१२. मायफल : उलटी, जुलाब कमी करण्यासाठी रोज द्या.

१३. सागरगोटे :जंत कमी करण्यासाठी, पोट फुगणे, दुखणे कमी करण्यासाठी रोज द्या.

१४. डिकेमाली : दात येत असताना होणारे सर्व त्रास कमी करण्यासाठी द्या.

१५. वावडिंग : उत्तम कृमिनाशक व बाळाची सर्वांगीण वाढ व्यवस्थित करण्यासाठी म्हणजे पचन सुधारणे, रक्त शुद्ध करणे यासाठी रोज द्या.

१६. सुंठ : पोट दुखणे, सर्दी, ताप, खोकला, डोके दुखणे, जुलाब, उलटी कमी करण्यासाठी रोज द्या.

१७. बदाम : पौष्टीक, बुध्दीवर्धक म्हणून रोज द्या.

१८. खारीक : शरीराची ताकत वाढविण्यासाठी, हाडे बळकट करण्यासाठी पोषक म्हणून रोज द्या.

१९. सुके खोबरे : हाडे बळकट करण्यासाठी, पोषक, केस व वर्ण सुधारण्यासाठी रोज द्या.

वरील सर्व औषधी,आईच्या दुधामध्ये, मधात किंवा सुवर्ण सिद्ध जलामध्ये उगाळून द्या. बाळास ३५ दिवसांपासून ते २ वर्षांपर्यंत गुटी द्या.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





वेताळ कथा ६
पुढे......
हे ऐकून वेताळ पुन्हा झाडावर जाऊन लटकला.
यावर, स्वत:ला शांतपणे विचारावे : "मला काही समजले की मी लगेच इतरांना सांगण्याची घाई करते का? की मी शांतपणे ऐकू शकते?"
खरे ज्ञान आवाज करत नाही, ते शांततेत प्रकट होते. श्रवण मनापासून करून मग प्रतिक्रिया दिली तर ती अधिक सखोल असते.
▪ आजचा चिंतन मंत्र
"खरे ज्ञान गर्वाने नव्हे, नम्रतेने प्रकट होते."
आतापर्यंत मनाचे ५ स्तर आपण पाहिले
आज मनाचा सहाव्या स्तरावर चिंतन करू या
वेताळ कथा ६ मध्ये मनाचा सहावा स्तर – "अहंकार आणि नम्रता यांचा संघर्ष" दिसतो.
▪ पहिला स्तर : इच्छा : मला काहीतरी मिळवायचे आहे. ▪ दुसरा स्तर स्पर्धा:इतरांपेक्षा पुढे जाण्याची भावना. ▪ तिसरा स्तर : अहंकार : मीच श्रेष्ठ आहे अशी भावना. ▪ चौथा स्तर : संशय : ▪ आपलीच योग्यताही कधी कधी प्रश्नात येते.
पाचवा स्तर जाणीव : आपल्या मर्यादा लक्षात येतात. ▪ सहावा स्तर नम्रता :खरे सामर्थ्य नम्रतेत असते.
असा सर्वकश विचार करून कृती करणे आवश्यक असते.
भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे दुर्गादेवी च्या नवरूपाची नवरंगी गुढी !

## सिडको माता मंदिर अरे वा हॉटेल पासून बजरंग चौक पर्यंत शोभा यात्रा व बजरंग चौकात २१ फुटी गुढीचे पुजन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : दरवर्षी प्रमाणे कुलस्वामिनी प्रतिष्ठान (वर्ष ११ वे) तर्फे हिंदु नववर्ष निमित्त दुर्गा माताची ९ रूप असलेल्या, नवरंगाची ९ गुढीची पुजा गुढी पाडवा मुहुर्तावर करण्यात येणार आहे.

कुलस्वामिनी प्रतिष्ठान व सिडको हडको हिंदु नववर्ष समिती व संयुक्त विद्यमाने हा भव्य उपक्रम शोभा यात्रा सह, गुढी पाडवा निमित्त होणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून मा.ना. अतुलजी सावे (कैबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य) मा.खा.डॉ. भागवतजी कराड, मा.आ. संजयजी केनेकर, मा.आ. अनुराधाताई



चव्हाण, मा. किशोरजी शितोळे (भा.ज.पा. शहर अध्यक्ष) मा. समीरजी राजुरकर (महापौर, छत्रपती संभाजीनगर) मा.अनिलजी मकरिये (मनपा सभापती,स्थाई समिती) या मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. तसेच नव निर्वाचित नगरसेवक व सिडको हडकोतील नागरिक उपस्थित राहणार आहेत.

गुढी पाडवा मराठी हिंदु नववर्ष निमित्त हा उपक्रम होणार असुन, गुढी पुजा झालेवर बजरंग चौक पर्यंत भव्य शोभा यात्रा काढण्यात येणार आहे.

५१ अनाथ मुली पण उपस्थित राहणार आहेत. सजवलेले वाहन, दोन घोडे, बैंड बाजा, भालदार-चोपदार, अब्दागिरी ही सर्व मिरवणूक मधे असणार आहेत.

बजरंग चौक या ठिकाणी २१ फुटी गुढी असणार आहे. या मधे मराठी भाषा व हिंदु संस्कृती विषयी समाजजागृती साठी स्लोगन-फलक असणार आहेत.

सर्वांचे फेटे घालुन स्वागत होणार असून, आलेल्या सर्व भगिनीना मोफत गिफ्ट मिळणार आहे. कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे सौ अलका व विलास कोरडे यांचे मार्फत हा उपक्रम होणार आहे.

# सौ.मानसी म्हसकर : प्रतिभा संपन्न साहित्यिका

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

गुजराती आणि मराठी काव्य संमेलनात अनेक वेळा तिने अतिशय सुंदर कविता सादर केल्या आहेत.

९२व्या मराठी साहित्य परिषदेत तिच्या कवितेची निवड केली गेली होती.

त्यानंतर अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित वर्धा येथे ९६ संमेलनात...मानसीच्या कवितेची निवड, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजितं अंमळनेर येथे ९७ वे संमेलन कविता आणि गझल या दोन्हींची निवड झाली. तसेच ९८ व्या संमेलनात निमंत्रित कवी मध्ये कविता सादर करण्याचा मान मिळाला आहे. या शिवाय मराठी वाङ्मय परिषद बडोदा आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा ६२व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित संमेलनात सहभाग होता.७ व्या मराठी वाङ्मय खुल्या संमेलनात सहभाग...

एक व्यक्ती किती अनेकानेक ठिकाणी आमंत्रित होते,आणि त्या त्या ठिकाणी सादर करण्याची संधी मिळाते.

यातच मानसीचे साहित्यिक प्रतिभा दिसून येते.

मानसीचा सकारात्मक दृष्टिकोन तिच्या विविध कवितेतून दिसून येतो.

मानसी काव्य संमेलनात कविता सादर करतेच पण गझल मुशायरा मधून गझल सुद्धा सादर करते. तिथे बऱ्याच वेळा निमंत्रित असते. ती जवळपास ३०ते ३५






समूहाकडून २०२०,२१,२२ सलग तीन वर्ष विविध बक्षिसं मिळाली आहेत.

मराठी वाङ्मय परिषदेत कथा स्पर्धा प्रथम क्रमांक मिळवून सन्मानित केले होते. कथा पूर्ती स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाले. अभंग लेखन स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पारितोषक, पाककला स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ,कथालेखन मध्ये प्रथम क्रमांक,मराठी वाङ्मय परिषद आयोजित २०२५ मधे प्रथम क्रमांक.२०२६ मध्ये रसग्रहण स्पर्धेमधे द्वितीय क्रमांक. निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक.या शिवाय अनेक लहानमोठ्या स्पर्धेत बक्षिसे मिळाली आहे. अभिवाचन हा मानसीचा आवडता छंद आहे. या शिवाय सूत्रसंचालन ही करत असते. बडोद्यात गांधर्व ढोल ताशा पथकात ढोल वाजवते. त्यात उत्कृष्ट महिला वादक म्हणून २०२३ मधे पुरस्कार प्राप्त झाला आहे. सर्वात जास्त वयाची वादक म्हणून बडोद्यात मान मिळवला आहे.

गुजराती व मराठी संमेलांत सहभागी झाली आहे. तिला बरेच पुरस्कार बक्षीस आहेत बरं का!!बडोद्याच्या जगप्रसिद्ध प्रेमानंद साहित्य सभेची ती आजीवन सदस्य म्हणून कार्यरत आहे.गुजराती भाषेत तिच्या कवितांसाठी अनेक पुरस्कार प्राप्त आहेत.गुजराती भाषेचे टी पी. एल या चॅनल वर तिचे ३०मिनिटांचे कविता सादरीकरण झाले होते.

मानसीला फुलोरा कलेचे माहेर घर या

नाही हं! फार वय नाही फक्त हाफ सेंचुरी ओलांडली आहे.मानसी म्हणजे झाकले माणिक आहे असेच मला वाटते. सर्वच क्षेत्रात मानसीचे मी मानसी नावाचे युट्यूब चॅनल आहे. त्याच बरोबर शुभंकर एक साहित्य प्रवास हा काव्य संग्रह प्रकाशित केला आहे. साहित्य क्षेत्रात नवनवीन प्रकार हाताळून शब्दांच्या अथांग महासागरात मनसोक्त चिंब भिजण्याची तिची वृत्ती दिसून येते... अभ्यासू वृत्ती उडवून येते.

निसर्गाच्या सान्निध्यात आणि इतरही सर्वत्र फिरण्याची तिला भारी हौस आहे..

तर अशी ही मानसी म्हसकर....मन धावेल तिकडे जाते आणि षटकार मारुन श्रोत्यांना आपलेसे करत असते. ज्या क्षेत्रात जाईल त्या क्षेत्रात सहजतेने वावरते... आणि प्रत्येक वेळी यशस्वी होते..

मन माझे मोरपिशी स्वप्न जणू...
मन माझे शिशिरातील इंद्रधनू
नवा छंद नवा ध्यास शोधी नवे आकाश...

असेच मानसीचे अष्टपैलू व्यक्तिमत्व. मानसीला साहित्यातील कुबेर असे म्हटले तर वावगे ठरू नये.









## अरुण वि.देशपांडे

लेखक-कवी-बालसाहित्यिक- समीक्षक
जन्म तारीख- 08-08-1951
वास्तव्य- पाटील नगर - बावधन-(बु)- पुणे.
मोबाईल- 9850177342
Email- arunvdeshpande@gmai.com
लेखन आरंभ- 1983-84
1.इंटरनेटवर लेखन-आरंभ- 2011
2. एकूण प्रकाशित पुस्तके- 80
मोठ्यांसाठी – 46, बालसाहित्य – 34,
■ प्रिंट बुक्स - 47 ■ ई बुक्स - 33
हिंदी कविता संग्रह प्रकाशित - 3
नुकतीच प्रकाशित झालेल्या काही पुस्तके
प्रिंट बुक्स- २
१. मला कवीचा चष्मा लागला - कविता संग्रह २७ फेब्रुवारी-२०२५
२. "पावसाचे गाणे" बालकविता संग्रह १७ एप्रिल-२०२४ -
ई -बुक- 3 शोपीजन डॉट इन यांनी प्रकाशित केली:
१.माझी आस्वाद समीक्षा,भाग-१
२.रहाट गाडगे - ई-कविता संग्रह,
३.मृगजळ - ई-कविता संग्रह

■ काही पुरस्कार- साहित्यिक बहुमान :
वर्ष-२०२६ ळ ०७ मार्च-२०२६ - मराठी बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर, बाल वाङ्मय पुरस्कार - २०२५- उत्कृष्ट बालकविता - पावसाचे गाणे" संग्रह.
०८ मार्च-२०२६ - ई दैनिक साहित्य लीला पंढरी प्रथम वर्धापनदिन सोहोळ्यात कविवर्य चंद्रकांतदादा वानखेडे" जीवन गौरव पुरस्कार"

■ १.२८ डिसेंबर -२०२५ - नवं उदय पत्रिका ग्वालियर मध्य प्रदेश यांचा - हिंदी साहित्य लेखन योगदानसाठी संत मीराबाई साहित्य, सांस्कृतिक सम्मान -२०२५ प्रदान.

■ २. ०७ डिसेंबर २०२५ रोजी पुण्यात होणाऱ्या तितीक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या दशकपूर्ती - साहित्य संमेलनात "पावसाचे गाणे", बालकविता संग्रहास उत्कृष्ट बालकविता - ग्रंथ गौरव पुरस्कार

■ ३. तितीक्षा इंटरनॅशनल -पुणे यांचा "तितीक्षा ग्रंथ गौरव पुरस्कार"-२०२५, मला कवीचा चष्मा लागला" या कविता-संग्रहास प्राप्त.

■ २.महाकवी कालिदास प्रतिष्ठान-पुणे यांचा महाकवी कालिदास काव्यप्रतिभा राष्ट्रीय पुरस्कार -२०२५. ■ ३.सर्वद फाउंडेशन -मुंबई- साहित्य योगदान बद्दल सर्वद जीवन गौरव पुरस्कार -२०२५, १८ जाने.२०२५, प्रदान करण्यात आला.

■ ४." पुण्यातील परभणीकर क्लब-पुणे संस्थेचा परभणी भूषण- साहित्य क्षेत्र पुरस्कार ०४ जाने - २०२५ रोजी प्राप्त.

■ ५. २०२५.
वाचनसाखळी समूह महाराष्ट्र राज्य- संमेलन - पुणे- वाचन यात्री पुरस्कार-२०२५, १०० पुस्तकांचे परिचय लेखन केल्याबद्दल प्रदान.

■ साहित्यिक बहुमान - वर्ष-२०२५
११ जाने-२०२५- प्रतिभा आणि प्रतिमा साहित्य समूह- पुणे येथे ३ रे साहित्य संमेलनात माजी अध्यक्ष म्हणून सहभाग.
नोव्हेम्बर-२०२५ - पलपब प्रकाशन -अहमदाबाद -आयोजितजुळता मनाची स्पंदने" राज्यस्तरीय काव्य सम्मेलन-२०२५ ,पुणे, यात कवी संमेलनअध्यक्ष म्हणून उपस्थित.

****

अरुण वि.देशपांडे-पुणे
संपर्क- मो-9850177342




## फायटो-केमिकल इंटिग्रिटी आणि होमिओपॅथिक नॅनो-फार्माकोलॉजी: सेंद्रिय कृषी व्यवस्थापनाचा प्रभाव

१. प्रस्तावना : होमिओपॅथी ही अल्ट्रा - मोलेक्युलर औषधोपचार पद्धती आहे. होमिओपॅथिक फार्मसीमध्ये सक्सेशन प्रक्रियेद्वारे वनस्पतीतील ऊर्जा नॅनो - पार्टिकल्समध्ये रूपांतरित केली जाते. या संशोधनाचा उद्देश हा आहे की, रासायनिक खतांमुळे वनस्पतींच्या सेल्युलर मॅट्रिक्समध्ये होणारे बदल औषधाच्या पोटेन्सी वर कसा नकारात्मक परिणाम करतात.

२. फायटो-फार्मास्युटिकल केमिस्ट्री आणि राईझोस्फीअर : औषधी वनस्पतींची गुणवत्ता ही त्यांच्या मुळांभोवती असलेल्या सूक्ष्मजीव सृष्टीवर अवलंबून असते. तांत्रिक विश्लेषण: रासायनिक खते जमिनीतील 'Ion एक्सचेंज कॅपॅसिटी बिघडवतात, ज्यामुळे वनस्पतीमध्ये सेकंडरी मेटाबोलीट्स (उदा. टर्पेनॉइड्स, फिनॉल्स) तयार होण्याची नैसर्गिक प्रक्रिया विस्कळीत होते.
सक्सेस ॲग्रो VAM चा परिणाम: VAM (मायकोरहीझल फंगी ) हे वनस्पतींच्या मुळांशी एक सिम्बॉयोटीक असोसिएशन तयार करतात. यामुळे वनस्पतीला ट्रेस इलेमेंट्स (उदा. झिंक, मॅग्नेशियम, तांबे) मिळतात जे होमिओपॅथिक औषधांच्या एंझ्यामॅटिक ॲक्टिव्हिटीसाठी अत्यंत आवश्यक असतात.

३. 'Potentization' मधील अडथळे आणि 'Residual Toxicity': होमिओपॅथीचा गाभा मेमरी of वॉटर या सिद्धांतावर आधारित आहे. जर औषधी वनस्पतीवर रासायनिक कीटकनाशकांचा वापर झाला असेल, तर त्या रसायनांचे इलेक्ट्रॉमॅग्नेटिक सिगनीचर वनस्पतीमध्ये कायम राहतात. निष्कर्ष : पोटेंटायझेशन प्रक्रियेत हे रासायनिक सिग्नेचर्स सुद्धा वाढवले जाऊ शकतात, ज्यामुळे औषधाचे पॅथोगेनेटिक परिणाम बदलू शकतात. म्हणूनच, सक्सेस ॲग्रो पुरस्कृत विषमुक्त शेती ही केवळ काळाची गरज नसून, होमिओपॅथीच्या शुद्धतेसाठी एक अनिवार्य अट आहे.

४. विटल फोर्स आणि सेंद्रिय कार्बनचे नाते : ज्या जमिनीत ऑरगॅनिक कार्बन (सेंद्रिय कर्ब) जास्त असतो, तिथे वाढणाऱ्या वनस्पतींमध्ये व्हिटॅलिटी जास्त असते. सक्सेस ॲग्रो OWDC (ऑरगॅनिक वेस्ट डिकॉम्पोसर ) तंत्रज्ञानामुळे जमिनीचा कर्ब वाढतो, ज्यामुळे वनस्पतीमधील बायो - फोटोन्स सुरक्षित राहतात. हेच बायो - फोटोन्स होमिओपॅथिक औषधांच्या प्रक्रियेत क्युरेटिव्ह पॉवर म्हणून काम करतात.








## विक्रम वेताळ आणि डायरेक्ट मार्केटिंग

**रमत गमत कोळी भिंतीवर चढे.......**

विक्रमाने आपला हट्ट सोडला नाही, मौन धारण करून तो दलाल स्ट्रीटवर आला, झाडावर लटकत असलेले प्रेत त्यांने खांद्यावर टाकले व तो सोनापूराकडे चालू लागला.

तेव्हा इतकावेळ प्रेतात बसलेला वेताळ जागा झाला आणि म्हणाला, विक्रमादित्य राजा, तु हे बालगीत नक्कीच ऐकले असेल, कदाचित लहानपणी शाळेत असताना मुलांबरोबर म्हंटले ही असेल..

रमत गमत कोळी भिंतीवर चढे
भिजत पावसाने खाली तो पडे
सुकत जमीन सारी उन्हं ते पडे
रमत गमत कोळी पुन्हा वर चढे....


मला हे गाणे आणि शेअर मार्केटची यांची तुलना केल्या शिवाय रहावत नाही... मी शेअर मार्केटची या गाण्या बरोबर केलेली तुलना तुला कशी वाटली? आणि शेअर मार्केट असं असूनही या मार्केटमध्ये लोक पैसे कसे कमावतात....

वेताळ उत्तराची वाट पाहु लागला... विक्रमादित्याच्या चेहऱ्यावर हलकेसे स्मित झळकले. तो म्हणाला, वेताळा माझ्या सहवासात राहून तु हल्ली खूप चांगला विचार करु लागला आहेस...तु या गाण्या बरोबर केलेली तुलना अगदी बरोबर आहे....कोळी म्हणजे इन्व्हेस्टर जो थोडी थोडी इनव्हेस्टमेंट करुन पुढे पुढे जात असतो, एकदम आणि नकळत घडलेल्या एखाद्या अनपेक्षित घटनेमुळे मार्केट कोसळते...इन्व्हेस्टर थोडा गांगरुन जातो पण त्या अनपेक्षित घटनेचा परिणाम ओसरला की मार्केट पुन्हा उभारी धरते आणि आपला इन्व्हेस्टर पुन्हा एकदा इनव्हेस्टमेंट करायला लागतो.... क्रमशः......




### मनुष्याला समजतं पण ऊमजतं नाही

आपल्याला आनंदी राहून सुख मिळवायचे आहे, पण त्यासाठी सकारात्मकता, मानवी पैलुचा
विकास, ऊद्देशाची भावना, समाधानी वृत्ती व कृतज्ञता कराव्याच लागतील.
भावनावर ताबा ठेवावाच लागेल. साधेपणा व नम्रता याला जीवनात महत्वाचे स्थान आहे! नौकरी उद्योग करून पैसा मिळवयाचा अन् पैसा का कमवायचा तर सुखासाठी- सुखाच्या शोधात आपण आनंद गमावतो, नि त्या आनंदाला शोधण्यासाठी पुन्हा दुःखी होतो.. आनंद सहज साध्य मिळाला असता तर त्याची किमत माणसाला
राहिली नसती ना.. पटत ना..! इतकं सोपं आहे हे.. म्हणून हे ओळखून कोणत्याही वयात फिरा., बागेत जा, सुगंधात नहा, पशूपक्षाचे कुजन ऐका, निसर्गात रमा, मुलाबाळांत एकरूप व्हा, आईची माया, बापाची छाया अनुभवा, पत्नीचं प्रेम-भांडण, रुसवा मनापासून स्विकारा, मित्रांची धमाल मनापासून स्विकारा, एन्जाय करा.. हेच सुख व आनंदी जीवनाची किल्ली आहे.. आज एवढं पुरे 'गहन व मोठा विषय आहे हा'
गूड डे, गुड मार्निंग, टेक केअर.. आवडलं तर वाचत चला.. परत भेटू उद्या... आणि हो, गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!


ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# गुढीपाडवा

ज्योतिर्मय साहित्य

माझ्या लेखाचे वाचक हे, उच्च दर्जा असणारे आहेत. सध्या मी लिहीत असलेली लेखमाला, संत चरित्रामृत व जाऊ देवाचिये गावा या लेखमाला सुरू असतानाच, एका सन्माननीय, विद्वान सदस्याने अशी सूचना केली की, मी आपल्या सणां विषयीची काही माहिति द्यावी. त्यांची ही सूचना अगदी योग्य आहे. कारण आज काल आपले, सण हे केवळ भोजन केंद्रीत झाले आहेत. तेही केवळ रूढी पाळायचे याप्रमाणे निर्जीव मनाने, त्या दिवशी थोडेफार गोडधोड केल्या जाते, व सण साजरा झाला असे आपण मानतो. खरे तर, आपले सण हे, आपल्या मनात साचलेली मरगळ झटकून टाकून, नव्या उमेदीने, नव्या उत्साहाने पुढील काळाला सामोरे जाण्यासाठी प्रेरणा देणारे मुख्य स्त्रोत आहेत.



या सणामागील प्रेरणा काय होत्या, त्या दिवशी इतिहासात काय दिव्य घटना घडल्या? अशा कोणत्या घटना घडल्या की आम्हास त्याचा सार्थ अभिमान वाटावा? आम्ही त्या दिव्य पुरुषांचे वंशज आहोत याचा अभिमानही आम्हास वाटावा अशी आपली संस्कृती आहे. असेच आपले सण आहेत. या सणां मागील प्रेरणा काय आहेत? त्यात पाळावयाच्या रुढी कोणत्या ?हे आपण विसरून चाललो आहोत. म्हणून केवळ उजाळा म्हणून लिखित रूपात या सणांचे महत्त्व विशद करण्याचा मी अल्पसा प्रयत्न करणार आहे.

गुढी पाडवा : हिंदू नववर्षाची सुरुवात ही चैत्र शुद्ध प्रतिपदे पासूनच होते. आणि हाच पहिला दिवस म्हणजेच गुढीपाडवा हा शालिवाहन संवत्सराचा पहिला दिवस असतो. गुढीपाडवा हा साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभ मुहूर्त आहे. या दिवशी नवनवीन वस्तू खरेदी करणे, नवीन व्यवसायास प्रारंभ, नवे उपक्रम, सुवर्ण खरेदी, नवीन वाहनांची खरेदी, तसेच टीव्ही, फ्रिज इत्यादींची खरेदी करणे शुभ समजण्यात येते.

गुढीपाडव्याच्या दिवशी मंगल आणि विजयाचे प्रतीक म्हणून गुढी उभारली जाते.

गुढी उभारण्याची पद्धती : चैत्र शुद्ध प्रतिपदेला सकाळी लवकर उठतात. स्नान करतात, आणि सूर्योदयानंतर गुढी उभारतात. गुढी उभारण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. एका उंच बांबूच्या वरच्या टोकाला, रेशमी वस्त्र किंवा साडी गुंडाळतात. तिथेच फुलाचा हार, साखरेची गाठी बांधून गाठीच्या वरच्या टोकावर तांब्या बसवितात. ही गुढी पाटावर उभी करतात.गुढी दारात, गच्चीत, अंगणात उंच ठिकाणी उभी करतात. गुढीला गंध, फुले, निरंजन, उदबत्ती लावतात. गुढीला गोडाचा नैवेद्य दुपारी अर्पण करतात. सूर्यास्तानंतर हळद-कुंकू अर्पण करून गुढी उतरविली जाते.

पाडव्याचे दिवशी काय करावे?

पाडव्याच्या दिवशी सकाळी स्नान करून गुढी उभी करतात. वर्ष प्रतिपदेच्या दिवशी विघ्नहर्ता गणपतीचे इतर देवांची ही दर्शने घ्यावीत. यानंतर गुरु वडीलधारे यांना वंदन करावे आणि संवत्सर फल श्रवण करावे. संवत्सर फलात साधारणपणे येणाऱ्या वर्षातील पाऊस पाणी पीक परिस्थिती राजकीय स्थिति याबद्दलचे भाकीत असते. या दिवशी दारावर मंगल तोरण लावतात. दारासमोर रांगोळ्या काढतात व घर सुशोभित करतात. गुढीपाडव्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, या दिवशी कडुलिंबाची चटणी करतात, व ती आग्रहपूर्वक खायला लावतात. यात कडुलिंबाची पाने, गूळ, चिंच इत्यादी घालून ही चटणी करतात. अशी चटणी खाण्यापासून पुढे येणाऱ्या काळात आरोग्यास बाधा येऊ नये तसेच जीवनात घडणाऱ्या कटू गोड प्रसंगाला समानतेने सामोरे जावे, अशी मनोभूमिका या चटणी खाण्यामागे असावी असे वाटते.

गुढीपाडव्याला इतर राज्यात काय म्हणून संबोधतात : महाराष्ट्रात गुढीपाडवा ,कर्नाटकात उगादी, आंध्र, तेलंगणा उगादी .काश्मीर-नवरेह, सिंधी समाज चेतीचंड, मणिपूर- साजीबु चेरोबा, गोवा संवत्सर पाडवा.

✍मधुकर बोरीकर
पुणे, 9403061886

गुढीपाडवा इतर राज्यात साजरा करावयाच्या पद्धती : काश्मीरमध्ये पंडित लोक हा दिवस नवरेह म्हणून साजरा करतात. ते तांदूळ, फुले, नाणे, पुस्तके ठेवलेली थाळी यांचे पूजन करतात.

सिंधी समाज हा दिवस भगवान श्री झुलेलाल यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करतात. ते झुलेलालांची प्रतिमेचे पूजन करतात. मिरवणुका काढतात. ध्वज पताका उभारतात.

तेलंगणा आंध्र प्रदेश व कर्नाटक या दिवशी सकाळी, येथील लोक, तेल लावून अभ्यंग स्नान करतात. घरासमोर रांगोळी काढतात व दारावरआंब्याची तोरणे लावतात. देवपूजा करून पंचांग श्रवण करतात. या दिवशी *उगादी पचडि* हा पदार्थ बनवितात. यात कडू, गोड, आंबट, तिखट, खारट, तुरट अशा सहा चवी असतात.

मणिपूर -साजीबू चेरोबा या नावाने हा सण साजरा होतो. यात घराची स्वच्छता, देवांना नैवेद्य, कुटुंबाचे एकत्रित भोजन असते. या दिवशी लोक डोंगर किंवा टेकडीवर चढतात. याचा अर्थ जीवनात प्रगती आणि उन्नती होवो, असा समजण्यात येतो.

गुढीपाडवा या दिवशी भूतकाळात घडलेल्या दिव्य घटना : १) ब्रह्मदेवाचा विश्व निर्मितीस प्रारंभ

महा प्रलया नंतर सर्व विश्व जलमय झाले होते. त्यावेळेस भगवान विष्णू योग निद्रेत होते. त्यांच्या नाभीतून एक कमळ प्रकट झाले, व त्या कमळावर ब्रह्मदेव प्रकट झाले. ब्रह्म देवाने, श्री विष्णूंच्या आज्ञेने, सृष्टी निर्मिती सुरू केली. त्यांनी प्रथम काळाची निर्मिती केली. यानंतर दिवस, रात्र, महिने, ऋतू निर्माण केले. याचाच अर्थ पृथ्वी इतर ग्रह व सूर्य यांचे भ्रमण हे सुरू केले. यानंतर ब्रह्मदेवांनी देव, ऋषी, मनुष्य, प्राणी यांची निर्मिती केली. हा सृष्टी निर्मितीचा पहिला दिवस, हा चैत्र शुद्ध प्रतिपदा आणि हिंदू नववर्ष मानल्या जाते.

२) इंद्राच्या विजयाची कथा : देव व दानवा मध्ये एकदा भयंकर युद्ध झाले. या युद्धात इंद्राने असुरावर विजय मिळविला. त्या विजयाच्या आनंदात, देवांनी इंद्राचा ध्वज उभारला. हा ध्वज इंद्र ध्वज म्हणून ओळखला जातो. काळानुसार या इंद्र ध्वजाचे रूपांतर गूढीत झाले. हे इंद्र ध्वजाचे प्रतीक मानण्यात येते.

३) शिशुपाल वध : शिशुपाल हा अत्यंत अहंकारी व अधर्मी राजा होता. त्याने राजसूय यज्ञाच्या वेळी तेथील सर्वश्रेष्ठ मानांकित भगवान श्री कृष्णांचा अपमान कारक उल्लेख करणे सुरू केले. त्या सूचना देऊनही तो निंदा करण्याचे थांबवेना. त्याचे शंभर अपराध पोटात घालीन ही शिशुपालाच्या आईस श्रीकृष्णाने दिलेले वचन पाळून, श्रीकृष्ण शांत राहिले. जेव्हा शिशूपालने शंभर अपराध पूर्ण केले, तेव्हा भगवान श्रीकृष्णांनी सुदर्शन चक्र फेकून शिशूपालाचा वध केला. जनतेने हा विजय उत्सव म्हणून साजरा केला हा विजय उत्सव गुढीपाडवा या दिवशीच झाला.

शालिवाहन शक

आपल्या महाराष्ट्रात एक पराक्रमी राजघराणे होऊन गेले. या राजघराण्याने या संपूर्ण प्रदेशावर थोडेथोडके नवे तर ४६० वर्षे भक्कम राज्य केले. इसवी सन पूर्व २३० ते इसवी सन २३० या कालावधीत शालिवाहन किंवा सातवाहन या राज घराण्यांची सत्ता होती. त्यांची राजधानी छत्रपती संभाजीनगर जवळील गोदावरी नदीच्या तीरावर वसलेले पैठण हे शहर होते. सातवाहनांनी सांस्कृतिक व राजकीय इतिहासात नवे दालन उघडले. त्यांच्या काळातील व्यापार हा तेर व पैठण या शहरातून थेट रोम व अथेन्स सारख्या शहरांशी जोडल्या गेला होता. भडोच, नालासोपारा, कल्याण, ठाणे, चौल ही पश्चिमी तीरावरील बंदरे होती. या राजांनी स्वतःला दक्षिणापथपती, तीसमुद्दतोय, पीत वाहन, अप्रतिहत चक्र अशी बिरुदे लावली. यातील बरेच राजे स्वतःचे नाव गौतमीपुत्र, वशिष्ठ पुत्र, माढरी पुत्र, अशी मातृ वाचक नावे वापरत. या काळात वैदिक धर्माचा उत्कर्ष झाला. कलांना उत्तेजन मिळाले. साहित्य निर्मिती झाली. या राजघराणात एकूण ३० राजे झाले. शिमुख, कृष्ण, सातकर्णी ,हाल वशिष्ठ, पुलवामी, यज्ञश्री,सातकर्णी ही काही श्रेष्ठ नावे होत. या राजांच्या काळातील दैदिप्यमान इतिहास असतानाही आपल्या अनुनय करणाऱ्या पुर्विच्या सरकारने हा इतिहास दडपून टाकला.

ज्यामुळे आपण गौरवान्वीत व्हावे, अशी नावे आपल्या विस्मृतीत गेली. शाली वाहनांनी हुणांचा पराभव केला. त्यांनी शक व छत्रप आक्रमणे परतवून लावली. सर्व जनतेला भयमुक्त पणे धर्मानुसार आचरण करण्यास सोय करून दिली. त्यांच्याच काळात पैठण ही साहित्य, कलाक्षेत्र, धर्म याचे पीठ म्हणून उदयास आले.

शालिवाहन राजांनी हुणांचा पराभव करून आपली सत्ता प्रबळ केली. या विजयाच्या प्रित्यर्थ त्यांनी पैठण येथे विजयस्तंभ उभा केला व सर्व जनतेने गुढी उभारण्याची परंपरा सुरू केली.

विस्मृतीत गेलेल्या आपल्या दिग्विजय पराक्रमी धर्मपरायण पूर्वजांचे स्मरण करून त्यांना विनम्रपणे अभिवादन करून आपण हा सण साजरा करूयात.

# शुभ गुढीपाडवा

ज्योतिर्मय साहित्य

गुढीपाडवा : संपूर्ण सृष्टीसाठी शुभ, समृद्ध, नवचैतन्य व मांगल्याचे प्रतीक.




फाल्गुन महिना म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा महिना व यात होळी/ धुलीवंदन म्हणजे जुन्या वर्षीचा शेवटचा सण साजरा करून संपणाऱ्या वर्षाला निरोप दिला जातो व नवीन वर्षाच स्वागत केले जाते.फाल्गुन नंतर चैत्र महिना लागतो हा महिना म्हणजे मराठी माणसासाठी नवीन वर्षाची सुरुवात म्हणजेच नवचैतन्य. हिंदु धर्मासाठी व मराठी माणसांसाठी गुढीपाडवा अत्यंत महत्वाचा सण म्हणुन साजरा केला जातो. गुढीपाडव्याचे संपूर्ण शुभ संकेत पुरातन काळापासून आपल्याला पहायला मिळतात.कारण गुढी हे समृध्दी, मांगल्य, चैतन्य व विजयाचे प्रतिक आहे.हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला ''गुढीपाडवा''सण साजरा करतो. आपल्या दाराशी गुढी उभारून समाजाला व जगाला विजयाचे आणि समृद्धीचे प्रतिक दर्शविण्यात येते. गुढी म्हणजे उत्सवाचे मोठे प्रतिकच! कारण याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्रांनी वालीचा वध करून त्याच्या छळापासुन प्रजेला मुक्त केले.त्याचप्रमाणे रामाने असुरी शक्तीचा नायनाट केला.याच दिवशी प्रभूरामचंद्रांचा वनवास संपला होता म्हणून हा दिवस आनंदोत्सवाचा दिवस मानण्यात येतो.याच दिवशी ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली हाच तो पवित्र दिवस. भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून याच दिवशी शंकासुरचा वध केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री शालिवाहन राजाने शके गणनेला सुरूवात केली. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला. मग या सैन्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला अशी आख्यायिका सुध्दा आहे. अशा प्रकारे पुरातन काळापासून आजपर्यंत विजयी दिवस म्हणून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

रमेश कृष्णराव लांजेवार
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

आजच्या दिवशी घरा-घरामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने गुढी उभारताना चांदीच्या किंवा तांब्याच्या किंवा पितळीचा लोटा, गोडवा निर्माण व्हावा म्हणून गाठी, शांतीच प्रतीक म्हणून आंब्याची डाहळी, कडु निंबाची डहाळी औषधीचे प्रतिक म्हणून, गुढीमध्ये नवे कापड इत्यादींच्या माध्यमातून गुढी उभारून गुढीपाडवा सण साजरा केला जातो. या मागचा एकच उद्देश असतो की सर्वांचे आरोग्य सुदृढ रहावे, नवचैतन्य निर्माण व्हावे आणि मराठी नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने व्हावी व खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून सर्वांनीच प्रगतीचा उच्चांक गाठावा व आरोग्य सुदृढ आणि निरोगी रहावे.या दिवसाला प्रत्येक जन आपल्या दारांमध्ये आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व दारांसमोर रांगोळी काढून नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुढीपाडवा आपण नववर्षाच्या उद्देशाने साजरा करतो.कारण येणारे दिवस सुखसमाधानाचे, सुखसमृद्धीचे जावो आणि येणारी पीढा व दुःख दुर व्हावे हाच यामागचा खरा उद्देश आहे. आपल्या मनातील स्वार्थीपणाची वृत्ती नष्ट होवून नवीन वर्षापासून आपले मन शांत, स्थीर व सात्त्विक बनविण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे.हाच खरा विजयी दिवस व गुढी उभारने हे खऱ्या अर्थाने विजयाचे प्रतिक व सार्थक समजण्यात येईल. चैत्राची सुरूवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा. याच दिवसांपासून रामाचे नवरात्र सुरू होते व ते रामनवमीला संपते.या दिवसाला इतके महत्त्व आहे की हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो.आपण ज्याप्रमाणे १५ ऑगस्टला स्वतंत्र दिवस साजरा करतो. त्याचप्रमाणे गुढीपाडव्याला प्रत्येक घरावर गुढी उभारून नवीन वर्षाची सुरुवात घराघरातुन साजरी केली जाते व आनंदोत्सव साजरा केला जातो.त्याचप्रमाणे आल्हाददायक वसंत ऋतू नंतरचा उन्हाळा बाधू नये म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच कडूनिंबाचे पाणे खावीत असे आयुर्वेद शास्त्र सांगतो. गुढीपाडवा विविध राज्यांत वेगवेगळ्या नावांनी साजरा केल्या जातो. गुढीपाडवा हा फक्त धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींनीच जोडलेला नसुन त्यात निसर्गाचा व पर्यावरणाचा सूध्दा विचार केल्याचे दिसून येते.

गुढीपाडव्याच्या दिवसाला मी हेच सांगु इच्छितो की प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेवून पुढील वाटचाल करावी. मराठी नववर्ष जगावेगळे असल्याचे आपल्याला दीसुन येते. इंग्रजी नववर्षाच्या सुरुवातीला जगभर दिखावा दाखवून जल्लोष साजरा करण्यात येतो. परंतु मराठी नववर्ष संय्यमतेने, आनंदाने, आदरतीथ्याने, प्रेमाने, मानसन्माने आणि मुख्यत्वे करून आरोग्याचा दृष्टीकोन सामोरं ठेवुन साजरा करण्यात येतो. त्यामुळे जगाचे नववर्ष व महाराष्ट्राचे नववर्ष यात जमिन आसमानचा फरक दिसून येतो. महाराष्ट्रासह भारतात बदलते हवामान लक्षात घेता व वाढते प्रदूषण पहाता आणि वाढते वनवे पहाता मराठी नववर्षाच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे.यामुळे प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मदत होईल. गुढीपाडव्याला प्रत्येकांनी वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल. यामुळे गुरांना चारा, पशु-पक्षांना सावली, मानवाला शुद्ध हवा आणि सर्वांना शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. यामुळे संपूर्ण पृथ्वीतलावर आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. यातच आपल्याला खरा गुढीपाडव्याचा व नवीन वर्षाचा विजयत्सोव व आनंदोत्सव दिसून येईल. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद.

# कवितेच्या लाटावर...



गुढी उभारुया

चैत्र प्रतिपदा। मंगल हा सण।
वर्षारंभ दिन। सोनियाचा ॥ १ ॥
दुष्ट दुर्जनांचे। केले निर्दालन।
कौसल्यानन्दन। परतले ॥ २ ॥
श्रीराम प्रभूंचे। आगमन घरी।
अयोध्या नगरी। आनंदली ॥३ ॥
विजयपताका। गुढ्या उभारल्या।
रांगोळ्या रेखिल्या। स्वागताच्या ॥४ ॥
नववर्षदिनी। गुढी उभारुया।
संस्कृती पाळूया। आपणही ॥ ५ ॥
गुढी उभारुया। नवचैतन्याची।
सुख आनंदाची। वृष्टी होवो ॥ ६ ॥
गुढी उभारुया। ज्ञान विज्ञानाची।
झेप प्रगतीची। उंच जावो ॥ ७ ॥
दुःख दैन्य दूर। होवो सकलांचे।
राज्य श्रीरामांचे। येवो आता ॥ ८ ॥
आज शुभदिनी। सदिच्छा ही मनी।
श्रीरामा स्मरूनी। भक्तिभावे ॥ ९ ॥

© विनया माधव जोशी



स्वप्नांना पंख नवे

स्वप्नांना पंख नवे म्हणती कसे
मज हेच हवे, जे नवे तेच हवे
गतवर्षी पाऊलखुणा सोडुनी
नववर्षाचे सुंदर लेणे मन भावे /१/

मनाच्या हिंदोळ्यावर झुलती
नव स्वप्नांचे रंगीत आकाशदिवे
त्यांच्या गवाक्षांतुनि झिरपती
आकांक्षांचे सप्तरंगी किरण नवे /२/

या हो या सारे गाऊ गीत नवे
सर्वांनी मिळून करु स्वागता
नववर्षाचे फुलती हास्यथवे
गतवर्षास साश्रू निरोप देता /३/

कालचक्र फिरे दावीत किमया
त्यास नसे कुणाचीच चिंता
स्वार्थाभोवती फिरते दुनिया
येणारा दिन असाच ओसरता /४/

करु नका तुम्ही उगाच क्षिती
हसतखेळत नवागताची नांदी,
कटुता न मागची,उदास स्मृती
नवोर्मिने नित राहू सारेआनंदी /५/

उद्याउगवेल नवप्राचीशुभारंभी
स्वर्णकिरणोत्सर्ग स्वागतारंभी
सुसंस्कृत वरदान मिळे मानवा
सद्भावना,सत्संग नववर्षारंभी /६/

स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
कला शिक्षिका.

# कवितेच्या लाटावर...



चंदनाचे काठी

सोनियाचा करा शोभे चंदनाचे काठी,
आनंदाची पहाट अन् साखरेच्या गाठी |
नांदी समृद्धी आजी घरोघरी,
मिळो सुख हेची बोल ओठी।
सोनियाचा करा शोभे चंदनाचे काठी ॥
साडी भरजरी पाहा गुडी ल्याली,
मराठमोळ्या थाटात आज ती सजली|
तोरण सौख्याचे बांधीयले द्वारी,
गुडी उभारली हो घरोघरी|
मस्तक तिचे पायी शुभ आर्शिवादासाठी,
सोनियाचा करा शोभे चंदनाचे काठी ॥

सौ. प्रियंका गौरव जावळे.
संभाजीनगर.
©priyagaurav.



गुढीपाडवा

आनंदाने करू नववर्षाची सुरुवात,
नवीन गुढी करेल सुखाची बरसात.
गुढी नेसली चैतन्याची वस्त्रे,
गुढीच्या शिरी तांब्या असे.

गुढीने घातला गाठीचा हार,
गुढी उभी काठीवर.
चला करूया नमस्कार,
पुढील वर्षी गुढी येणार.

गुढीसमोर भव्य रांगोळी,
रामाच्या मंदिरात दर्शनासाठी ओळी.
भाविक भक्त तेथे जमले,
राम आरती करू लागले.

अलकानंतसूत श्रीपाद दसरे
छ. संभाजीनगर
मो. 9975950801

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# हिंदू-नव वर्षाची सुरुवात - गुढीपाडवा

**ज्योतिर्मय साहित्य**

हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुध्द प्रतिपदेला ''गुढी पाडवा'' सण आपण साजरा करतो. आपण साडेतीन मुहूर्त मानतो, त्यातील गुढीपाडवा हे एक मुहूर्त आहे.

कॅलेंडरनुसार, गुढी पाडवा चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीला सुरू होतो. प्रतिपदा तिथी १९ मार्च रोजी सकाळी ६:५२ वाजता सुरू होईल आणि २० मार्च रोजी पहाटे ४:५२ पर्यंत चालणार आहे. तिथीनुसार, गुढी पाडवा १९ मार्च २०२६ रोजी साजरा केला जाईल. चैत्र नवरात्र देखील याच दिवशी सुरू होईल.

'हिंदु संस्कृतीमध्ये गुढीपाडवा हा केवळ नवीन वर्षाचा प्रारंभ नसून, तो अधर्मावर धर्माच्या विजयाचे प्रतीक असलेला अत्यंत शुभ दिवस आहे. प्रभु श्रीराम १४ वर्षांचा वनवास संपवून आणि आसुरी शक्तींचा विनाश करून जेव्हा अयोध्येत परतले, तेव्हा अयोध्येतील भाविक नागरिकांनी आनंद आणि विजय यांचे प्रतीक म्हणून घराघरांवर गुढ्या उभारल्या होत्या. तोच विजयोत्सव आणि तीच आदर्शाची गुढी आजही आपल्याला खऱ्या अर्थाने 'रामराज्य' स्थापन करण्याची प्रेरणा देत आहे.

आपल्या दाराशी गुढी उभारणे हे विजयाचे तसेच समृद्धीचे प्रतिक समजले जाते. याच दिवशी अनेक जण नविन व्यवसायाला प्रारंभ करतात. नविन वाहन, नविन फ्लॅट, घर,अशा नानाविध वस्तूंची खरेदी करतात. जो तो आपापल्या ऐपती प्रमाणे सोने खरेदी करतात. एक ग्रॅम का असेना, पण घेतात. त्या दिवशी ते महत्त्वाचे मानले गेले आहे. ते समृद्धीचे समजतात.

गुढीपाडव्याचे दिवशी अनेक जण शुभ संकल्प करतात. ह्या दिवशी केलेले संकल्प फलदायी ठरतात.असा अनेकांना अनुभव आहे.

गुढीपाडवा आपसातील वैरभाव, मतभेद, विसरून शांतता मिळवून देणारा आनंददायी असा सण आहे.

नवसंवत्सराचा प्रारंभ होतो. नववर्षाचा हा पहिला दिवस महत्वाचा तसेच पवित्र समजला जातो. ह्याच दिवशी नविन वर्षाचे पंचांग आणून त्याचेही पूजन केले जाते.

अनेक शहरात, गावात, पहाटेच भक्तिसंगिताचे पाडवा पहाट सारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. अनेक ठिकाणी पारंपारिक वेशभूषा करून शोभायात्रा काढल्या जातात, आणि नववर्षाचे स्वागत केले जाते. आनंददायी सुरुवात केली जाते.

नविन वर्षाचे स्वागतासाठी दारा समोर गुढी उभारली जाते. गुढी हे विजयाचे, मांगल्याचे प्रतिक आहे. सकाळी मंगल स्नानादी उरकून, नविन वस्त्र परिधान करुन, बांबूच्या काठीला पिवळ्या किंवा भगव्या-केशरी रंगाचे वस्त्र नेसवून, गुंडाळून, तांब्याच्या किंवा चांदीचा कलश उलटा ठेवतात. त्याला गंध लावून कडूनिंबाचे पानाचा घोस लावतात. साखरेचा गाठीचा हार, फ ुलांचा हार घालतात. हळदीकुंकवाने पूजा केली जाते.निरांजन उदबत्ती ओवाळतात. पेढ्याचा नेवैद्य दाखवतात. मंगल वाद्यावर वादन केले जाते. आणि नववर्ष सुखसमृध्दीचे, आनंदाने जावे म्हणून मनोभावे प्रार्थना केली जाते.

गुढी दाराशीच उजव्या बाजूला, तशीच खिडकी मध्ये, गच्चीवरही उभारली जाते. दाराशी सडा टाकून सुंदर रांगोळ्या काढतात. घराच्या मुख्य दरवाज्यावर




आंब्याची पाने, झेंडुच्या फुलांचे तोरण लावतात. पूजेनंतर कडूनिंबाची पान आणि गुळ मिश्रण सेवन करतात. येणारे वर्ष आरोग्यदायी जाव, उन्हाळा त्रासदायक ठरु नये हीच त्यामागील भावना असते. तसेच ओवा, मीठ, हिंग, मिरी, आणि साखर हे कडुलिंबाच्या पानात वाटून खातात.

यामुळे पचनक्रिया सुधारणे, पित्ताचा नाश, त्वचा रोग बरे होणे, आदी गोष्टी शक्य होतात. आयुर्वेदात याला खूप महत्त्व आहे.

बहुसंख्य कुटुंबात गुढीपाडव्याला श्रीखंड-पुरीचाच बेत जेवणात असतो.

प्रभु श्रीरारमचंद्राचे विजयाचे प्रतीक, रावणावरच्या विजयाचे कौतुक, असा हा आनंददायी सण

विजय पताका श्रीरामाची झळकते अंबरी...
प्रभु आले मंदिरी....
गुलाल उधळूनी नगर रंगले...
भक्त जनांचे थवे नाचले...
राम भक्तिचा गंध दरवळे ...
गुढ्या तोरणे, घरोघरी.. ग.घरोघरी.।
प्रभु आले मंदिरी,...
अयोध्येचा आला राजा...

या गाण्यात त्याच खूप छान वर्णन केल आहे.

रावणाच्या त्रासातून मुक्त झाल्यानी, व श्रीरामाचे आगमन झाल्याने नगरवासीय आनंदित झाले आहे.. त्यांनी गुढ्या उभारल्या, तोरणांनी घरे सजविले, गुढीपाडव्याचे दिवशी घरोघरी हे गाणं ऐकायला मिळत.

पार्वतीचा आणि महादेवाचा विवाह पाडव्याच्या दिवशी ठरला असल्याची देखील कथा आहे.

संध्याकाळी परत गुढीची पूजा करुन गुढी उतरवण्याची प्रथा आहे.

गेल्या अनेक वर्षापासूनचा आपल्यावर पाश्चात्यांचा पगडा कायम आहे. एक जानेवारीलाच नववर्ष साजरा करण्याचा पायंडा पडला आहे. ३१ डिसेंबरला मद्यधुंद अवस्थेत सरत्या वर्षाला निरोप द्यायचा, आणि त्याच अवस्थेत नववर्षाच्या स्वागत करायच. फटाके फोडायचे, बघा काय विचित्र आणि हिडीस प्रकार सुरु आहे. मग अनेक प्रकार घडतात. अपघात, मारामाऱ्या, बलात्कार, विनयभंग, संस्कृतीच अधः पतन सुरु आहे. कोण थोपवणार हे सगळं? ज्यांनी काहीतरी करायला हव, ते बसतात मुग गिळून गुपचुप. सरकारी तिजोरीत मात्र खूपसारा पैसा जमा होतो. निरनिराळ्या वृत्तपत्रांतून दारुविक्रीचा उच्चांक जाहीर होतो. विक्रमी विक्री होते. डिसेंबरचा शेवटच्या आठवडा आणि जानेवारीचा पहिला आठवडा पर्यंत शासनाने दारूबंदी करावी, बघा कोण नववर्ष साजर करतो? (नव्वद टक्के लोकांच हे नववर्ष केवळ आणि केवळ मद्य प्राशनासाठी आणि पार्ट्या साठीच

साजर करणं असते हे सांगायला नकोच.) काय साध्य होतय यातून?.

सत्ययुगाचा आरंभ म्हणजे गुढीपाडवा, ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली तो दिवस म्हणजे गुढीपाडवा. प्रभूश्रीरामाचे आगमनाचा दिवस. आपला गुढीपाडवा हाच नववर्षाचा दिवस आहे आणि पाश्चात्यांनी आपल्यावर लादलेला नववर्ष दिवस हा मोडीत काढायला हवा आहे. त्यादृष्टीने सर्वसमावेशक प्रयत्न करायला हवे.

गुढीपाडवा.. आध्यात्मिक दृष्टीने अतिशय महत्वाचा दिवस आहे. आणि ते योग्यच आहे.




पाश्चात्त्यांच करत असलेले अंधानुकरण रोखण्यासाठी आपण सर्वानीच पुढाकार घ्यायला हवा. गुढीपाडव्याला मांगल्याची गुढी उभारून, नववर्षाचे स्वागत करुन, एकमेकांना नववर्षाच्या मंगलमय शुभेच्छा देऊन आपला मराठी बाणा जपू या !

गुढीपाडव्याच्या शोभायात्रा गावोगावी निघतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलनही असते. वातावरणात चैतन्य असते. अशी ही नववर्षाची सुरुवात आनंदाने, उत्साहात करु या.

सर्वाना गुढीपाडवा व हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा !

# नववर्षाभिनंदन...!

**ज्योतिर्मय साहित्य**

आपृच्छस्व पुराणम् आमन्त्रयस्व च नवम्
आशा-सुस्वप्न-जिगीषाभिः।
नववर्षशुभाशयाः

विश्वावसु संवत्सर संपून पराभव संवत्सर येत आहे. खूप उत्सुकता प्रत्येकाच्या मनात आहे व हृदयात परिवर्तनाचे संख्येतही आहेत. मनाचा गोंधळ आहे कारण सगळीकडे अस्थिरता, अस्वस्थता दिसते आहे. काय अर्थ आहे व काय वैशिष्ट्य या संवत्सराचे जरा चिंतन करू या.

पराभव = पर + अभव
''पर'' म्हणजे श्रेष्ठ, परम, उच्च
''अभव'' म्हणजे अभाव होणे, नष्ट होणे

याचा एक आध्यात्मिक अर्थ असा घेता येतो

अहंकाराचा पराभव, अधर्माचा पराभव व अज्ञानाचा नाश, म्हणजे बाह्य पराजय नव्हे, तर अंतर्मनातील असत्याचा पराभव.

भारतीय पंचांगातील ६० संवत्सरांची नावे ही केवळ कालमापन नसून चेतनेच्या प्रवासाची प्रतीके आहेत.

''पराभव'' वर्ष आपल्याला सांगते- जे खोटे आहे ते टिकणार नाही
जे अहंकारातून उभे आहे ते कोसळेल पण जे सत्यावर आधारले आहे ते अधिक दृढ होईल

जसे भगवद्गीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात -
''अधर्माचा नाश आणि धर्माची स्थापना''
पराभव म्हणजे अधर्माचा पराभव धर्माचा विजय निश्चित असतो.

पराभव संवत्सर म्हणजे : मनातील शंका हारतील भीती हारेल मोह हारेल, पण आत्मसाक्षात्कार जिंकेल. हे वर्ष आपल्या अंतर्मनातील स्थिरतेला अधिक परिपक्व करेल.

एक सकारात्मक दृष्टी : जसा रात्र येते तेव्हाच पहाट उगवते, तसा पराभव हा नाश नसून परिवर्तनाचा टप्पा आहे. कधी कधी आपला ''अहं'' हरतो तेव्हाच ''आत्मा'' जिंकतो.

जे तुटते ते कदाचित खरे नव्हतेच. पराभव म्हणजे बाह्य पराजय नव्हे, अंतर्मनातील असत्याचा पराभव.

हे वर्ष कदाचित आपल्याला काही आसक्ती, काही चुकीचे विश्वास सोडायला लावेल - पण त्या बदल्यात अधिक शुद्ध, अधिक सत्यस्वरूप देईल.

जेव्हा अहंकाराचा पराभव होतो, तेव्हाच आत्म्याचा प्रभाव प्रकटतो. जसे भगवद्गीतेत सांगितले आहे -

''अहंकार, काम, क्रोध यांचा त्याग केल्यावर मन शुद्ध होते.''



मन शुद्ध झाले की प्रभाव आपोआप निर्माण होतो.

जीवनानुभव : स्थैर्यापूर्वी कदाचित काहीतरी तुटले असेल, काही भ्रम गळाले असतील तोच पराभव असतो.

पराभव म्हणजे गळणारी पानं
प्रभाव म्हणजे उमलणारी नवी कळी
पराभव हा प्रभावाचा पाया आहे.
मोहाचा पराभव विवेकाचा प्रभाव
भीतीचा पराभव धैर्याचा प्रभाव
अज्ञानाचा पराभव ज्ञानाचा प्रभाव

जर ''पराभव'' संवत्सर असेल,
ती बाह्य हार नव्हे, तर अंतर्मनातील शुद्धीकरणाचा काळ आहे -
ज्यामुळे पुढे ''प्रभाव'' अधिक तेजाने झळकेल.
पराभवाशिवाय प्रभाव नाही. हा परिवर्तनाचा नियम आहे.
''पराभव ते प्रभाव : आत्मप्रकाशाची यात्रा''
समजावून घ्यावी लागेल.

पराभव हे ६० संवत्सरांच्या चक्रातील ४० वे संवत्सर आहे. आणि अक्षय हे त्या चक्रातील ६० वे (शेवटचे) वर्ष आहे.

म्हणजे पराभवानंतर अक्षयपर्यंत अजून २० संवत्सर येतात.

येणाऱ्या संवत्सराचा क्रम असा आहे:
प्लवंग, कीलक, सौम्य, साधारण, विरोधिकृत, परिधावी, प्रमादीच, आनंद, राक्षस, नल, पिंगळ, कालयुक्ति, सिद्धार्थी, रौद्र, दुर्मती, दुंदुभि रुधिरोद्गारी, रक्ताक्षी, क्रोधन व अक्षय

म्हणून हो अजून २० वर्षांनी अक्षय संवत्सर येईल, आणि मग पुन्हा चक्र नव्याने ''प्रभव'' पासून सुरू होते

''जे संपते ते आवश्यक असते'' याचा खरा अर्थ
जीवनात: काही नाती तुटतात काही भूमिका संपतात
काही श्रद्धा बदलतात काही भ्रम गळतात
जेव्हा काही संपतं, तेव्हा त्याची किंमत कळते -
आणि आपण परिपक्व होतो.
हा आंतरिक विकासाचा नियम आहे.
पण याचा अर्थ ''संपूर्ण जगाचा शेवट'' असा नसतो.
२०२० नंतर लोकांना असे का वाटते?
२०२० मध्ये मोठे बदल झाले -
भीती, मृत्यू, अनिश्चितता, आर्थिक उलथापालथ.
मानसशास्त्र सांगते की अशा काळात मनाला
''मोठ्या दैवी योजनेचा भाग'' अशी कथा हवी असते. जेणेकरून भीतीला अर्थ मिळेल.



अपर्णा परांजपे,
पुणे मो. 95030 45495

पण अर्थ शोधणे आणि भविष्य निश्चित सांगणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

भगवद्गीतेत श्रीकृष्ण म्हणतात -
''उद्धरेदात्मनाऽत्मानं'' स्वतःच स्वतःला उन्नत कर.

धर्मस्थापना बाहेर अचानक होणार नाही; ती व्यक्तीच्या अंतर्मनातून सुरू होते.

जर तुम्हाला बदल जाणवत असेल, तर तो तुमच्या अंतर्गत परिपक्वतेचा संकेत आहे संपूर्ण जगाच्या अंतिम अध्यायाचा नव्हे.

सगळ्यात महत्त्वाचं की आपण कालचक्र पूर्ण करायला आलेलो नाही. आपण जाणीव जागवायला आलेलो आहोत.

श्वास किती आहेत हे आपल्या हातात नाही,
पण प्रत्येक श्वास किती जागरूक आहे हे आपल्या हातात आहे.
भगवंत हृदयस्थ आहे

# आला आला गुढी पाडवा

**ज्योतिर्मय साहित्य**

मित्रांनो, आज गुढी पाडवा.

आपल्या मराठी संस्कृतीमधे, गुढी पाडवा या सणाला अनन्य साधारण महत्व आहे.

गुढी पाडवा हा सण चैत्र शुद्ध प्रतिपदेला मराठी नववर्षाची सुरुवात म्हणून साजरा केल्या जातो. आणि हा साजरा करण्यामागे विविध कथा ही आहेत.

सृष्टीच्या निर्मिती वैदिक ग्रंथानुसार, श्री ब्रम्हदेवाने याच दिवशी सृष्टीची निर्मिती केली आहे असे मानले जाते.

याच दिवशी प्रभू श्रीरामचंद्र हे रावणावर विजय मिळवून (अर्थात चांगल्याने वाईटावर विजय) परत अयोध्येमध्ये दाखल झाले होते.

त्यांच्या स्वागतासाठी सर्वांनी घराची स्वच्छता दारात सुंदर सुंदर रांगोळ्या काढल्या व दारी तोरण ही लावले.

प्रभू श्रीरामचंद्र जेंव्हा रावणाला हरवून अयोध्येत आले तेंव्हा गुढी किंवा ब्रम्हध्वज उभारून आनंद साजऱ्या केल्या गेला. गुढी ही विजयाची प्रतीक आहे. हे आजतागायत चालू आहे.



गिरीश वसेकर ( देशपांडे)
नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००

गुढी ही उंच बांबूपासून तयार केल्या जाते. बांबूच्या एका टोकावर हळदी कुंकवाने रेखाटलेला सहसा तांब्याच्या तांब्या उलटा अडकवून त्यावर वस्त्र, कडुलिंबाचा फांटा, फुलांचा हार, गाठी घालून सजविल्या जातो. याच पद्धतीने दारोदारी गुढ्या उभारून श्री प्रभुरामचंद्राचे स्वागत केल्या गेले आणि ही प्रथा, परंपरा अखंड चालू आहे, याचा प्रत्येक मराठी माणसाला अभिमान आहे.

महाराष्ट्रात विविध ठिकाणी पुरुष, स्त्रिया पारंपरिक पोषाखात तयार होऊन येतात आणि सुंदर अशी शोभा यात्रा ही बऱ्याच ठिकाणी काढल्या जाते. उत्साहात, ढोल ताशाच्या गजरात, हातात ध्वज घेऊन ही मिरवणूक निघत असते आणि मराठी पंचांगानुसार नववर्षाचे स्वागत ही केल्या जाते,

सर्वत्र प्रसन्न वातावरण असते आणि सर्व जण एकमेकांना शुभेच्छा देत असतात.

तसेच या दिवशी कडुनिंबाची कोवळी



पाने, जिरे, हिंग, ओवा, यांचे मिश्रण प्रसाद म्हणून खातात. यामुळे आरोग्य चांगले राहते व शरीर नवीन ऋतूसाठी वसंत ऋतू साठी सज्ज राहते

तर असा हा पवित्र व सुंदर मराठी सण आणि परंपरा अंखड चालू आहे.

गुढी पाडव्यावर माझी स्वलिखित कविता खाली दिली आहे.

गुढी पाडवा

आली पहाट सोनेरी
चैत्र शुद्ध प्रतिपदेची
दारी उभारली गुढी
आनंद नी चैतन्याची
सुगंध चंदनाची काठी
रेशमी साडीने सजली
सुवर्ण फुलांचा हार लेवूनी
गाठी खाऊनी हसली
दारी रांगोळी फुलली
रंगीबेरंगी रंगाच्या साथीने
आंब्याच्या पानांचे तोरण
लखलखले आनंदाने
दिन हा मराठी अस्मितेचा
असे हिंदू नववर्षाचा
असत्याला हरवून आलेल्या
अयोध्येत जयघोष श्रीरामाचा
असा पवित्र हा सण
करू साजरा उत्साहाने
एकमेका करू मदत नी
जपू मैत्री अपुली प्रेमाने.

आपल्या सर्वांना हे नवीन वर्ष सुख, समाधान, आरोग्य, धन संपदा व उत्कर्षाचे असो हिच ईश्वरचरणी प्रार्थना

आणि आपल्या सर्वांना गुढी पाडव्याच्या खूप शुभेच्छा

# शैक्षणिक दिपस्तंभ जयवंत करणारे - पै.श्री जयवंतआबा...

ज्योतिर्मय साहित्य



ग्रामीण विकासाचा एक विलक्षण अनुभव पाठीशी घेऊन शिक्षण हेच तरुणाईच्या उज्वल भविष्याला आकार देऊ शकते, त्यासाठी प्रत्यक्ष काम वेगाने केले तर गतिमान टेक्नॉलॉजीच्या युगात तरुणाईला पूरक व पोषक शिक्षण देता आले तर समृद्ध शिक्षणप्रणाली उभी राहू शकते आणि या समृद्ध शिक्षणप्रणालीतून हिरे घडले तर त्यांच्या मागाहून पडलेली पाऊले सोन्याहून पिवळी असतील हाच कयास मनी होता म्हणूनच शैक्षणिक दिपस्तंभ नव्याने जयवंत करणारे पैलवान श्री जयवंतआबा पवार यांचे नाव आवर्जून शिक्षण क्षेत्रात घेतले जाते.

चिंधवली ता.वाई हे संथ वाहणाऱ्या कृष्णामाईच्या सहवासातील विशेष ओळख असणारे गाव आणि पैलवान श्री जयवंतआबा पवार हे याच गावातील पवार घराण्यातील दूरदृष्टी व्यक्तिमत्त्व.

अ अ म्हणता आई, ब ब म्हणता बाबा बोलत एक एक पाऊल टाकत चालायला लागणाऱ्या बालरत्नांपासून ते विद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण भागातील मुलामुलींना सोयीचे ठरणारे तिरंगा इंग्लिश स्कूलचा शैक्षणिक वटवृक्ष आज पाचवड ता.वाई येथे डोलाने उभा करण्यासाठी त्यांनी अविरत कष्ट घेतले आहेत, म्हणूनच त्यातूनच सृजनशील पिढ्या घडत आहेत, वाढत आहेत तितक्याच वेगाने पुढे जात आहेत. दूरदृष्टी वाटचालीतून मुलांच्या भवितव्यासाठी आज पर्यंत चांगले शिक्षण मिळत असल्यानेच १००% निकालाची परंपरा त्यांनी राखली, वाढवली म्हणूनच विविध परिक्षेतून मुले वेगवेगळ्या क्षेत्रात शाळेबरोबर आपल्या परिसराचे आणि विशेषतः आईवडीलांचे नाव मोठे करत आहेत, मैदानी खेळातून देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचणारी मुलं तिरंगा इंग्लिश स्कूलची पताका तितकीच डोलाने फडकवत आहेत. त्यांच्या जोडीला सौभाग्यवती वनिताताई सावलीसारख्या त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक टप्प्यावर उभ्या आहेत म्हणूनच शाळेचा आलेख उंचावला आहे.

आणि त्यातच स्पर्धा परीक्षांतून पुढे जाणाऱ्या तरुणाईसाठी शहराकडे जावे लागत होते म्हणूनच तिरंगा स्कूल येथे प्रशस्त श्री राजेश स्वामी साहेब आय एफ एस यांचे नावे राजेश अभ्यासिका सुरू करून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने टाकलेलं दमदार पाऊल नक्कीच दिशादर्शक आहेच.

शेती, माती, कुस्ती, शिक्षण, समाजकारण आणि सेवाभावी दातृत्व या सर्वांचा संगम त्यांच्या हातातून घडतोय म्हणूनच टप्पा टप्प्यावर आबांचे नाव प्रकर्षाने घेतले जाते,

त्यांनी अनेक माणसं जोडली, अनेकांना सहकार्य केले, अनेकांना सेवाभावी दातृत्वातून हात पुढे करत नवी उर्जा, पाठिंबा देतायत आणि सुखदुःखात तितक्याच ताकदीने बरोबरीने उभे राहतायत म्हणूनच ते नावाने जयवंत आहेतच, यशवंत, किर्तीवंत आणि नामवंत विशेष नावं आज त्यांना जोडली जातात हिच त्यांच्या सन्मानाची खरी पोहोच पावती म्हणावीच लागेल.

म्हणूनच समाजाकडे बघण्याची त्यांची जी सर्वसमावेशकता आहे म्हणूनच अव्याहतपणे लोकोपयोगी दिशादर्शक वाटचाल ते जगतायत ती इंद्धनुष्याची छबी निर्माण करण्याइतपत सर्वांगसुंदर...

✍
**दिपक पवार, चिंधवली**
**मो. 75883 82445**

म्हणूनच त्यांनी हाती घेतलेले जनसेवेचे वृत अव्याहतपणे जगतील, आकाशात ऊन आणि पाण्याचा जेव्हा संघर्ष होतो तेव्हाच आकाशात इंद्रधनुष्य तयार होते.

सार्वजनिक जीवनातील आयुष्यही असच असत, सुख-दुखाचे गोड कडू अशा विविध अनुभवाचे हेलकावे खात पुढे जाव लागते आणि तडजोडी मुळे नुकसान होत नसते तर उलट संधीच मिळते ती इंद्रधनुष्य फुलवण्याची.

असंख्य अनुभव घेत प्रसंगी आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जातीलही आणि त्यांच्या प्रामाणिक, निस्वार्थी भावनेतून समाज प्रबोधनाच्या कामांचा आणखी डोंगर उभा करतील आणि पुढेही एक सृजनशील समाज घडवतील हेच त्रिवार सत्य....!

# गुढीपाडव्याच्या दिवशी करावयाच्या धार्मिक कृती

ज्योतिर्मय साहित्य

कुठलाही सण आला की त्या त्या सणाच्या वैशिष्ट्याप्रमाणे आणि आपल्या पद्धतीप्रमाणे आपण काहीतरी करीतच असतो. मात्र धर्मात सांगितलेल्या अशा पारंपरिक कृतींमागील अध्यात्मशास्त्र लक्षात घेतल्यास त्याचे महत्त्व आपल्याला पटते. गुढीपाडव्याच्या दिवशी केल्या जाणाऱ्या धार्मिक कृतींची माहिती सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखात जाणून घेऊया तसेच सध्याच्या आपत्काळात गुढीपाडवा कसा साजरा करायचा हेही समजून घेऊया.



अभ्यंगस्नान (मांगलिक स्नान) : गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी लवकर उठून प्रथम अभ्यंगस्नान करण्यास सांगितले आहे. अभ्यंगस्नान करतांना देशकालकथन करतात.

तोरण लावणे : स्नानानंतर आम्रपल्लवांची तोरणे सिद्ध करून प्रत्येक द्वाराशी लाल फुलांसहित बांधावी; कारण लाल रंग शुभदर्शक आहे.

पूजा : प्रथम नित्यकर्म देवपूजा करतात. 'वर्षप्रतिपदेला महाशांती करायची असते. शांतीच्या प्रारंभी ब्रह्मदेवाची पूजा करतात; कारण या दिवशी ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली. पूजेत त्याला दवणा वाहतात. नंतर होमहवन आणि ब्राह्मणसंतर्पण करतात. मग अनंत रूपांनी अवतीर्ण होणाऱ्या विष्णूची पूजा करतात. 'नमस्ते बहुरूपाय विष्णवे नमः ।', हा मंत्र म्हणून त्याला नमस्कार करतात. नंतर ब्राह्मणाला दक्षिणा देतात. शक्य झाले तर इतिहास, पुराणे इत्यादी ग्रंथ ब्राह्मणाला दान देतात. ही शांती केल्याने सर्व पापांचा नाश होतो, उत्पात घडत नाहीत, आयुष्य वाढते आणि धनधान्याची समद्धी होते, असे सांगितले आहे.' संवत्सर पूजा केल्याने सर्व पापांचा नाश होतो, आयुष्यवृद्धी होते, सौभाग्याची वाढ होते आणि शांती लाभते. या दिवशी जो वार असेल, त्या वाराच्या देवतेचीही पूजा करतात.

गुढी उभारणे : या दिवशी विजयाचे प्रतीक म्हणून सूर्योदयाच्या वेळी शास्त्रशुद्ध गुढी उभारली जाते. गुढी सूर्योदयानंतर लगेचच मुख्य द्वाराच्या बाहेर; परंतु उंबरठ्यालगत (घरातून पाहिल्यास) उजव्या अंगाला (बाजूला) भूमीवर पाट ठेवून त्यावर उभी करावी. गुढी उभी करतांना तिची स्वस्तिकावर स्थापना करून पुढे थोडीशी कललेल्या स्थितीत उंचावर उभी करावी. सूर्यास्ताच्या वेळी गुळाचा नैवेद्य दाखवून गुढी उतरवावी.

दान : याचकांना अनेक प्रकारची दाने द्यावीत, उदा. पाणपोईद्वारा उदकदान. याने पितर संतुष्ट होतात. 'धर्मदान' हे सर्वश्रेष्ठ दान आहे, असे शास्त्र सांगते. सध्याच्या काळात धर्मशिक्षण देणे, ही काळाची आवश्यकता आहे.

पंचांगश्रवण : ज्योतिषाचे पूजन करून त्याच्याकडून किंवा 'उपाध्याकडून नूतन वर्षाचे पंचांग अर्थात् वर्षफल श्रवण करतात. या पंचांगश्रवणाचे फल सांगितले आहे, ते असे

तिथेश्च श्रीकरं प्रोक्तं वारादायुष्यवर्धनम् ।
नक्षत्राद्धरते पापं योगाद्रोगनिवारणम् ।।
करणाच्चिन्तितं कार्यं पञ्चाङ्गफलमुत्तमम् । एतेषां श्रवणान्नित्यं गङ्गास्नानफलं लभेत् ।।

अर्थ : तिथीच्या श्रवणाने लक्ष्मी लाभते, वाराच्या श्रवणाने आयुष्य वाढते, नक्षत्रश्रवणाने पापनाश होतो, योगश्रवणाने रोग जातो, करण श्रवणाने चिंतिले कार्य साधते. असे हे पंचांगश्रवणाचे उत्तम फल आहे. त्याच्या नित्य श्रवणाने गंगास्नानाचे फल मिळते.'

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**
**संकलन– श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क– ९२८४०२७१८०**

कडुनिंबाचा प्रसाद : पंचाग श्रवणानंतर कडुनिंबाचा प्रसाद वाटायचा असतो. हा प्रसाद कडुनिंबाची पाने, जिरे, हिंग, भिजलेली चण्याची डाळ आणि मध यांपासून सिद्ध करतात.

भूमी (जमीन) नांगरणे : या दिवशी भूमीत नांगर धरावा. नांगरण्याच्या क्रियेने खालची माती वर येते. मातीच्या सूक्ष्म कणांवर प्रजापति लहरींचा संस्कार होऊन बीज अंकुरण्याची भूमीची क्षमता अनेक पटींनी वाढते. शेतीची अवजार अन् बैल यांवर प्रजापति लहरी उत्पन्न करणाऱ्या मंत्रासह अक्षता टाकाव्या. शेतात काम करणाऱ्या माणसांना नवीन कपडे द्यावे. या दिवशी शेतात काम करणारी माणसे अन् बैल यांच्या भोजनात पिकलेला भोपळा, मुगाची डाळ, तांदुळ, पुरण इत्यादी पदार्थ असावेत.

सुखदायक कृत्ये : नाना प्रकारची मंगल गीते, वाद्ये आणि पुण्य पुरुषांच्या कथा ऐकत हा दिवस आनंदाने घालवावा. हल्लीच्या काळी सण म्हणजे मौजमजा करण्याचा दिवस अशी काहीशी संकल्पना झाली आहे; मात्र हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे सण म्हणजे 'अधिकाधिक चैतन्य मिळवण्याचा दिवस' असतो. त्यामुळे सणाच्या दिवशी सात्त्विक भोजन, सात्त्विक पोषाख, तसेच अन्य धार्मिक कृत्ये इत्यादी करण्यासमवेतच सात्त्विक सुखदायी कृत्ये करण्यास शास्त्राने सांगितले आहे. सण, धार्मिक विधीच्या दिवशी अन् गुढीपाडव्यासारख्या शुभदिनी नवीन किंवा कौशेय (रेशमी) वस्त्रे आणि अलंकार धारण केल्याने देवतांचे आशीर्वाद लाभतात.वस्त्रांत आकृष्ट झालेल्या देवतांच्या तत्त्व लहरी वस्त्रांमध्ये दीर्घकाळ टिकून रहातात आणि ही वस्त्रे वर्षभर परिधान करणाऱ्याला देवतांच्या तत्त्वलहरींचा वर्षभर लाभ होतो.

गुढीपाडव्याच्या दिवशी करावयाची प्रार्थना : 'हे ईश्वरा, आज तुझ्याकडून येणारे शुभाशीर्वाद आणि ब्रह्मांडातून येणाऱ्या सात्त्विक लहरी मला जास्तीतजास्त ग्रहण करता येऊ देत. या लहरी ग्रहण करण्याची माझी कुवत नाही. मी तुला संपूर्ण शरण आलो आहे. तूच मला या सात्त्विक लहरी ग्रहण करायला शिकव', हीच तुझ्याचरणी प्रार्थना !

***

# गुढीपाडवा : नवचैतन्य, स्वाभिमान आणि नवसंस्कृतीचा उत्सव



ज्योतिर्मय साहित्य

भारतीय संस्कृतीत सण-उत्सव हे केवळ आनंदाचे क्षण नसतात; ते समाजाच्या इतिहासाचे, परंपरेचे आणि सामूहिक भावनांचे प्रतीक असतात. प्रत्येक सणामागे एखादी प्रेरणा, एखादा ऐतिहासिक संदर्भ आणि जीवनाला दिशा देणारा संदेश दडलेला असतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेला सण म्हणजे गुडीपाड़वा. हा दिवस केवळ नवीन वर्षाचा प्रारंभ नाही, तर नवचैतन्य, नवउमेद आणि नव्या आशेचा आरंभ आहे. वसंत ऋतूच्या आगमनासोबत येणारा गुढीपाडवा हा सण भारतीय संस्कृतीच्या जीवनदायी परंपरेचे प्रतीक आहे. निसर्गात जशी नवपालवी फुटते, तशीच नव्या वर्षाची सुरुवात जीवनात नवीन संधी, नवीन विचार आणि नवीन ऊर्जा घेऊन येते. म्हणूनच गुढीपाडवा हा केवळ धार्मिक सण नाही; तो आशावाद, पुनरुत्थान आणि सकारात्मकतेचा उत्सव आहे.

भारतीय पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला नवीन वर्षाची सुरुवात होते. याच दिवशी महाराष्ट्रात गुढीपाडवा साजरा केला जातो. हा दिवस उगड़ी म्हणून आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात साजरा होतो, तर उत्तर भारतात याच काळात चैत्र नवरात्री सुरू होते. यातून भारतीय संस्कृतीची एक महत्त्वाची वैशिष्ट्य दिसते, भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेतूनही एकात्मतेची भावना. भारताच्या विविध भागात नाव वेगवेगळी असली तरी नववर्षाचे स्वागत करण्यामागची भावना एकच आहे नवीन सुरुवात, नव्या आशा आणि नव्या शक्यता. गुढीपाडव्याच्या दिवशी घराच्या प्रवेशद्वारावर उभारली जाणारी गुढी ही विजय, समृद्धी आणि स्वाभिमानाचे प्रतीक मानली जाते. बांबूच्या काठीवर रेशमी वस्त्र, साखरेची गाठी, कडुलिंबाची पाने आणि वर तांब्याचा किंवा चांदीचा कलश लावून गुढी उभारली जाते. ही गुढी केवळ धार्मिक परंपरा नाही; ती विजयाचा आणि सकारात्मकतेचा ध्वज आहे. घराच्या दाराशी उभारलेली गुढी जणू सांगत असते, अडचणी कितीही असल्या तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा.

गुढीपाडव्याशी अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ जोडलेले आहेत. काही परंपरांनुसार हा दिवस इतिहासकारांच्या मते शिवाजी यांच्या विजयाचे प्रतीक म्हणूनही गुढी उभारली जाते. या संदर्भांचा अर्थ इतकाच गुढी म्हणजे विजयाचा ध्वज. अन्याय, पराभव किंवा संकटावर मात करून उभे राहण्याची प्रेरणा या सणातून मिळते. गुढीपाडवा हा सण निसर्गाशीही अतूटपणे जोडलेला आहे. चैत्र महिन्यात निसर्गात नव्या पालवीचे आगमन होते. झाडांना नवी पाने फुटतात, फुलांचा सुगंध दरवळतो, वातावरणात ताजेपणा भरतो. हा निसर्गाचा संदेश आहे, जीवनात कितीही कठीण काळ आला तरी नव्या सुरुवातीची संधी नेहमी असते. म्हणूनच गुढीपाडवा हा निसर्गाशी एकरूप होऊन नव्या जीवनाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. सण हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम असतात. गुढीपाडव्याच्या दिवशी लोक एकमेकांना भेटतात, शुभेच्छा देतात, आनंद वाटून घेतात.

**प्रविण बागडे**
नागपूर

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणसांमधील संवाद कमी होत चालला आहे. तंत्रज्ञानाने अंतर कमी केले असले तरी मनांमधील दुरावा वाढत आहे. अशा वेळी गुढीपाडवा आपल्याला स्मरण करून देतो, समाजाचा खरा आधार म्हणजे परस्परांचे नाते आणि विश्वास. आजचा काळ वेगवान बदलांचा आहे. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि जीवनशैली झपाट्याने बदलत आहे. या बदलांच्या प्रवाहात अनेकदा आपली सांस्कृतिक परंपरा मागे पडताना दिसते. सण-उत्सव अनेकदा केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहतात. परंपरेचा अर्थ न समजता केवळ विधी पार पाडले जातात. मात्र गुढीपाडवा आपल्याला सांगतो, सण साजरा करण्याचा खरा अर्थ म्हणजे जीवनात सकारात्मकता, मूल्ये आणि सांस्कृतिक अभिमान जपणे.

गुढीपाडवा म्हणजे केवळ शुभेच्छा देण्याचा दिवस नाही; तो नवीन संकल्प करण्याचा दिवस आहे. समाज म्हणून आपण स्वतःला प्रश्न विचारायला हवा, आपण अधिक संवेदनशील समाज घडवत आहोत का? आपण सामाजिक समतेच्या दिशेने पावले टाकत आहोत का? आपण पर्यावरणाचे रक्षण करत आहोत का? नवीन वर्षाचा खरा अर्थ म्हणजे केवळ कालगणनेचा बदल नाही, तर विचारांचा आणि कृतीचा बदल. जागतिकीकरणाच्या या युगात अनेक संस्कृती एकमेकांशी मिसळत आहेत. हे सकारात्मक असले तरी आपल्या संस्कृतीची ओळख जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गुढीपाडवा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सण आहे. या सणातून आपली परंपरा, आपले मूल्य आणि आपली सांस्कृतिक ओळख जपली जाते. गुढीपाडवा हा सण आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो, जीवनात कितीही संकटे आली तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा. गुढी म्हणजे विजयाचे प्रतीक, नववर्ष म्हणजे नव्या संधींचा प्रारंभ आणि हा सण म्हणजे जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा.

आजच्या बदलत्या काळात गुढीपाडव्याचा खरा अर्थ समजून घेतला तर हा सण केवळ परंपरा राहणार नाही; तो समाजाला दिशा देणारा प्रेरणादायी उत्सव ठरेल. नवीन वर्ष आपल्यासाठी प्रगती, समता, आनंद आणि समृद्धी घेऊन येवो, समाजात बंधुभाव वाढो आणि प्रत्येकाच्या आयुष्यात नवचैतन्य फुलो, हीच या मंगल दिनी अपेक्षा. गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!